बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ४८ | बुधवार,दि.०२ नोव्हेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# महसूल मंत्र्याच्या जिल्हा आगमनाने कुणाच्या समस्या सुटणार?



● महसूल विभागातील अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी
● १६ कर्मचारी नियुक्तीच्या तारखेपासूनच सेवा संलग्नेतवर कार्यरत

### उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांची पदे रिक्त

**राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गोंदिया जिल्ह्याकडे मंत्रालयातील एसीमध्ये बसणाऱ्या सचिवांनी व मंत्र्यांनी सातत्याने दुर्लक्षच केले आहे. त्यामुळे या जिल्ह्यात रिक्त पदांचा बोजवारा सातत्याने वाढत चालला आहे. गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात ४ उपजिल्हाधिकारी, २ तहसीलदार पदे रिक्त आहेत. यामध्ये भुसंपादन उपजिल्हाधिकारी, रोहयो उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांचा समावेश आहे. तर आमगाव व देवरी येथील तहसीलदारांची पदे रिक्त आहेत. चिचगड अप्पर तहसील कार्यालय तसेच २ नायब तहसीलदारांची जिल्हाधिकारी कार्यालयातील पदे रिक्त आहेत. रिक्त पदांसाठी महसूल कर्मचारी संघटनांनी जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात २८ जुलै रोजी आंदोलन केले होते. तरीही महसूलमंत्री व मुख्यमंत्र्यांनी रिक्त पदे भरण्याकरिता कुठलेही पाऊल उचलेले नाही.**

### कर्मचाऱ्यात महसूल विषयक बाबींचा माहितीचा अभाव

**महसुल विभाग हा महत्वाचा विभाग असून या विभागातील प्रत्येक कर्मचारी अधिकारी वर्गाला महसूल विषयक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.शासनही यांना याची जाणीव असल्याचे गृहीतच धरते. मात्र गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने अप्पर जिल्हाधिकारी यांनी नुकत्याच पार पडलेल्या महसुल कर्मचारी अधिकारी यांच्या प्रशिक्षण वर्गात विचारलेल्या महसुल विषयक विविध प्रश्नांची उत्तरे निम्याहून अधिक कर्मचारी वर्ग देऊ शकला नसल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे प्रशिक्षणात एकाच पदावर वर्षानुवर्ष ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

### शासन निर्णयालाही जिल्हाधिकारी कार्यालयाचा ठेंगा

**महसूल अधिनियमात मंडळ अधिकारी जो असले त्यास कार्यालयातील कामाची माहिती व्हावी यासाठी ३ वर्ष अव्वल कारकूनचे तर अव्वल कारकुनला ३ वर्ष मंडळ अधिकारीचे काम कार्यालयाबाहेर फिल्डवर जाऊन करण्याचा शासन निर्णय आहे. या शासन निर्णयाची अमलबजावणी राज्यातील बहुतांश जिल्हाधिकारी कार्यालयात केली जाते,मात्र गोंदिया जिल्ह्यात अद्यापर्यंत या शासन नियमाची अमलबजावणीच करण्यात आली नसल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

### लाच प्रकरणातील मेमन पुन्हा मुळ आस्थापनेवर कसे

**जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिनियुक्तीवर राहिलेले राजेश मेमन हे लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात अडकल्यानंतर त्यांना इतर ठिकाणी अकार्यकारी पदावर पदस्थापना देणे आवश्यक होते. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने मेमन यांना नियमित करित मुळ आस्थापना असलेल्या देवरी तहसील कार्यालयातच कुठल्या आधारावर पाठविले हा संशोधनाचा विषय ठरला आहे. आमगाव तहसिल कार्यालयात लाच लुचपत प्रतिबंधक विभागातर्फे घालण्यात आलेल्या झाडीमध्ये आमगाव तालुक्यातील श्रीमती छाया रहांगडाले या पकडल्या गेल्या होत्या.त्यादेखील अनेक वर्षापासून एकाच पदावर एकाच कार्यालयात कार्यरत होत्या. यांना मात्र अद्यापही लाच प्रकरणानंतर नियुक्ती देण्यात आलेली नाही. एकीकडे मेमन यांना नियुक्तीस्थळ देण्यात आले. तर श्रीमती रहांगडालेंना नियमित नियुक्ती न देता त्यांना देवरी तहसील कार्यालयात जोडण्यात आले आहे. त्यांना नियमित करण्यासाठी ताटकळत ठेवण्यामागची भुमिका काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

**गोंदियाः-** राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गोंदिया जिल्ह्याच्या प्रशासकीय कामकाजाची धुरा सांभाळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालल्याने कामाचा ताण इतर कर्मचारी व अधिकाऱ्यांवर वाढू लागला आहे. या अतिरिक्त ताणामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांवर मानसीक तणाव वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यात स्वयंघोषित मातब्बर नेते असले तरी त्यांनी आपल्या जिल्ह्यातील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याकरिता मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केल्याचे कुठेच दिसून येत नाही. यामुळेच की काय जिल्हाधिकारी कार्यालयात आजच्याघडीला उपजिल्हाधिकारी दर्जाची ४ ते ५ पदे रिक्त पडली आहेत. आदिवासी भाग असलेल्या देवरी आमगावात तहसीलदार नाही.सोबतच २५ पदे रिक्त पडली आहेत. तर पदोन्नती न झाल्याने नायब तहसीलदारांची पदे ही रिक्त पडली आहेत. गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत उच्च श्रेणी लघूलेखक १, निम्मश्रेणी लघूलेखक ५, अव्वल कारकून ११, मंडळ अधिकारी ३, लिपीक टंकलेखक ७६, लघु टंकलेखक २, वाहन चालक ८ व शिपाई ३० असे सरळसेवा व पदोन्नतीचे १३६ पदे आजही गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त पडली आहेत. त्यातच राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे बुधवारला २ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विषयक बाबींचा आढावा घेतांना या रिक्त पदांबाबत काय निर्णय घेतात याकडे जनतेचे व महसूल कर्मचारी संघटनेचेही लक्ष लागले आहे. रिक्त पदांची समस्या सोडविण्यास प्राधान्य देतात की राईस मिलर्स सारख्या व्यवसायीकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देतात हा सुद्धा महत्वाचा विषय राहणार आहे.

प्रशासकीय कामकाज अचूक आणि निर्दोष व्हावे, कोणतेही हितसंबंध जोपासले न जाता कोणावरही अन्याय होऊ नये, असे अपेक्षित असताना गोंदिया जिल्ह्यात मात्र या परंपरेला उघड फाटा दिला जात आहे. चक्क जिल्हाधिकारी कार्यालयातच बदली संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक तत्वांना तिलांजली दिली जात असेल तर जिल्ह्यातील इतर कार्यालयाबाबत न बोललेलेच बरे. गेल्या १०-१५ वर्षापासून एकाच खुर्चीवर एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांकडे बदली प्रकरणात एकाही जिल्हाधिकाऱ्यांने लक्ष देऊ नये? हे अनाकलनीयच म्हणावे लागेल. या कुंडलीबाज कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण करण्यात जिल्हाधिकाऱ्यांसारख्या अधिकाऱ्यांची हतबलता की त्या कर्मचार्यांची दबंगाई जिल्ह्यासाठी चिंतेची बाब ठरली आहे.

प्रशासन म्हटले की शिस्त ही असलीच पाहिजे. शिस्त पाळली जात नसेल तर प्रशासकीय कामात चुका आणि अनियमितता या बाबी अपरिहार्य आहेत. कर्मचारी असो वा अधिकारी यांचे नियमित अंतरालाने स्थानांतरण हे अपेक्षित आहे. तसा प्रशासकीय नियम देखील आहे. अधिक काळ एकाच ठिकाणी ठाण मांडून एखादा कर्मचारी वा अधिकारी राहत असेल तर त्याचे नागरिकांशी हितसंबंध वाढलेले असतील. परिणामी, अशा कर्मचाऱ्याकडून शासकीय कामात अनियमितता वा गैरप्रकार होण्याची शक्यता बळावते. हे देवरीतून जिल्हाधिकारी मुख्यालयात प्रतिनियुक्तीवर राहिलेले राजेश मेमन व आमगाव येथील महिला कर्मचारी श्रीमती रहांगडाले हे लाच प्रकरणाच्या जाळ्यात अडकल्याने सिद्ध झाले आहे.

प्रतिनियुक्तीवर असलेले यातील बहुतांश कर्मचाऱ्यांनी देवरी, सालेकसा, चिचगड, अर्जुनी मोर या नक्षलग्रस्त भागात नोकरीच केलेली नाही.

कर्मचाऱ्यांचे असो वा अधिकाऱ्यांचे, नियमित अंतराने स्थानांतरण केले जात नसेल तर त्यांचा कार्यात निरसता तर येतेच, पण नागरिकांशी हितसंबंध आल्याने एखाद्या प्रकरण्यात चुकीच्या पद्धतीने कामे होण्याची दाट शक्यता असते. याशिवाय अधिक काळ एकाच पदावर वा एकाच ठिकाणी राहिल्यास आर्थिक गैरव्यवहार व कार्यालयातील गोपनियता बाहेर भंग होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. याशिवाय इतर विभागातील कार्याचा अनुभव अशा कर्मचाऱ्यांना येत नाही. परिणामी, भविष्यात याचा फटका या कर्मचाऱ्यांमुळे शासन प्रशासनाला बसल्यास नवल वाटू नये.

मात्र, गोंदिया जिल्ह्यातील महसुल विभागाचे प्रमुख कार्यालय असलेल्या गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाला या सर्वांचे भानच राहिले नाही की काय? अशी परिस्थिती आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत जवळपास १६ कर्मचारी हे नियुक्तीच्या तारखेपासून आपल्या मूळ कार्यालयात फक्त नाममात्र रुजू झाले. मात्र, त्यांची सेवा इतर कार्यालयात संलग्न आहे.

एक कर्मचारी तर २०१२ पासून व एक कर्मचारी हा वाहन चालक ते कनिष्ठ लिपिक ते अव्वल कारकून अशा पदोन्नतीनंतरही काही कर्मचाऱ्यांना आपला प्राण गमवावा लागला आहे. विशेष म्हणजे अशा कर्मचाऱ्यांची पदोन्नती पश्चात सेवा गणना करून आहे त्याच ठिकाणी पदस्थापना एकाच कार्यालयात ठाण मांडून आहे. तर गोंदिया जिल्ह्यातील ४ ते ५ कर्मचारी हे गेल्या १५-१६ वर्षांपासून विभागीय आयुक्त कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहेत. जेव्हा की, शासन नियमानुसार कमीत कमी ३ व जास्तीत-जास्त ६ वर्षाच्या कालावधीमध्ये आपल्या मुळ आस्थापनेवर यांना आवश्यक असते. त्यांच्या जागेवर नवीन कर्मचाऱ्यांना पाठवायला हवे होते. मात्र असे होत नाही. असे असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभाग धृतराष्ट्राप्रमाणे बदली व प्रतिनियुक्ती प्रक्रिया पार पाडत असल्याचे स्पष्ट होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या या अव्यवहार्य कार्यप्रणालीमुळे केल्याचे चित्र तयार केले जाते. अनेक कर्मचाऱ्यांची पदस्थापना ही तर फक्त कागदोपत्री इतरत्र करण्यात येऊन सेवासंलग्न या पर्यायाखाली त्यांना वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी कार्यरत ठेवण्यात येत आहे. याचे परिणाम हे गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यात पहावयास मिळालेले आहे. बाहेरील तालुक्यातील कर्मचारी यांना पदस्थापना किंवा सेवासंलग्न जिल्हाधिकारी कार्यालयात केले जात असून जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना इतर तालुक्यातील तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालयात सेवासंलग्न केल्याची बाब साशंकता निर्माण करणारी आहे.

## सीटी-१ पाठोपाठ आता टी-६ वाघिणीची दहशत;वर्षभरात घेतले ५ बळी

**गडचिरोली-** तालुक्यातील राजगाटा-कळमटोला परिसरात पाच जणांचे बळी घेणाऱ्या टी-६ या वाघिणीला पकडण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्याच्या ताडोबा व अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील वनविभागाची चमू पोर्ला आणि चातगाव वनपरिक्षेत्रात दाखल झाली आहे. काही दिवसांपूर्वीच सीटी -१ वाघाला कित्येक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर जेरबंद करण्यात यश आले होते. त्यानंतर आता टी-६ या हल्लेखोर वाघिणीला जेरबंद करणे वन विभागासमोर मोठे आव्हान ठरणार आहे.गडचिरोली वनवृत्ताच्या वडसा वनविभागातील पोर्ला व गडचिरोली वनविभागातील चातगाव वनपरिक्षेत्रात समाविष्ट गावांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून वाघांचा वावर आहे. चातगाव वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या राजगाटा चेक येथील व्यक्तीचा या वाघिणीने बळी घेतला होता. तेव्हापासून ह्या परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली आहे. आतापर्यंत याच परिसरातील १३ लोकांचे बळी वाघांनी घेतले. यात टी-६ वाघिणीने ५ नागरिकांना ठार केले आहे. त्यामुळे या वाघिणीचा बंदोबस्त करण्याची मागणी सातत्याने केली जात होती. या मागणीची दखल घेत गडचिरोली वनवृत्ताने मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनरक्षक (वन्यजीव) नागपूर यांच्याकडे हल्लेखोर वाघिणीला जेरबंद करण्यासाठी परवानगी मागितली होती. त्यानुसार दोन चमू येथे दाखल झाल्या असून ३० नोव्हेंबरपर्यंत वाघिणीला जेरबंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

## गुप्तांग आणि नखांसाठी अस्वलाची शिकार;चार जणांना अटक



**गडचिरोली,दि.०१-**नखे आणि गुप्तांगासाठी जीवंत विद्युत तारेच्या साह्याने अस्वलाची शिकार केल्याची धक्कादायक घटना सिरोंचा वन विभागातील आरडा परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणात सिरोंचा वनविभागाच्या पथकाने चार आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून अस्वलाची २० नखे जप्त करण्यात आली आहे. मधुकर मलय्या दुर्गम (रा. पेंटीपाका), महेंद्र चंद्रय्या कुम्मरी, राजबापू पेदासमय्या दुर्ग व समय्या मलय्या दुर्गम (सर्व रा. लक्ष्मीपूर), अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.२७ ऑक्टोबर रोजी सिरोंचा वनपरिक्षेत्रातील आरडा नियत क्षेत्रात अस्वल मृतावस्थेत आढळून आले होते. एकंदरीत घटनास्थळावरील स्थितीवरून अस्वलाची शिकार केल्याचे स्पष्ट होत होते. याप्रकरणातील संशयित आरोपींच्या शोधार्थ सिरोंचा वनपरिक्षेत्राधिकारी पी. एम. पाझारे यांच्या मार्गदर्शनात पथक रवाना झाले होते. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात वनविभागाला यश आले आहे. आरोपींनी अस्वलाच्या चारही पायाचे पंजे तसेच गुप्तांग कापून नेले होते. चौकशीदरम्यान घटनास्थळापासून जवळच असलेल्या जंगल परिसरात मोहाच्या झाडालगत आरोपींनी अस्वलाची नखे पिशवीत लपवून ठेवल्याची कबुली दिली.

## महिला पदाधिकारी पतीराजाला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात 'नो एन्ट्री'

**गोंदिया :** सरपंच गावाचा प्रथम नागरिक असल्याने त्याचा वेगळाच तोरा असतो. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या सभापती, व महिला जिल्हा परिषद सदस्य, महिला सरपंच सक्षम असतानाही, अनेक पतीराज किंवा नातेवाईक कामात हस्तक्षेप करीत कारभार करतात. त्यामुळे शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्वच घटकातील महिला पदाधिकारीच्या पती व नातेवाइकाला कार्यालयातच येण्यास बंदी केली आहे.



तसेच कामात हस्तक्षेप आढळून आल्यास थेट कारवाई करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत.

आहे.याच शासन निर्णयात जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या महिला सदस्यासह सभापतीसाठीही हीच तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या महिला सदस्यासंह सभापतींचे पतीराज व नातेवाईक स्वतःच विभागप्रमुख असलेल्या अधिकाऱ्याला दमदाटी करण्याच्या प्रकारात सातत्याने वाढ होत असल्याने व आम्हाला न विचारता कुठलाही दौरा करु नये आम्ही जसे म्हणतो तसे करा अशी भूमिका घेत असल्याचे प्रकार शासनाच्या लक्षात आल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभागाने पत्र काढले आहे. मात्र त्या पत्रालाही सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीसह, ग्रामपंचात पातळीवर केराच्या टोपलीत घालून पतीराजांचे अतिक्रमण वाढल्याचे चित्र संपुर्ण राज्यातच असल्याचे समोर आले आहे. ज्याठिकाणी सध्या प्रशासक आहेत तेथील अधिकारी सध्या मोकळे असले तरी पदाधिकारी असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे अधिकारी आजही या त्रासाला सामोरे जात असल्याचे चित्र आहे.

पत्नी सरपंच, जि.प. सभापती, पंचायत समिती सभापती असली तर पती तिच्या कामात लुडबूड करीत असल्याचे अनेकदा बघायला मिळते. परंतु पती किंवा नातेवाईक हस्तक्षेप करताना आढळून आल्यास थेट कारवाई करण्याचा निर्णय राज्य शासनाने २००७ मध्येच घेतला असला तरी त्या निर्णयाची अमलबजावणी कुठेच होतांना दिसून येत नाही. त्यामुळे पडद्यामागून काम करणाऱ्या महिला सरपंच, सदस्य व सभापती पतीला चाप बसणार अशी जी धारणा होती, ती मात्र धुळीस मिळाली आहे. यासाठी सर्वसामान्य जनतेसह अधिकारी वर्गानेही पुढे येण्याची गरज झाली आहे.

सरपंच गावाचा प्रथम नागरिक असल्याने त्याचा वेगळाच तोरा असतो. महिला सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या महिला सदस्य व सभापती सक्षम असतनाही अनेक पतीराज किंवा नातेवाईक कामात हस्तक्षेप करीत कारभार करतात. त्यामुळे शासनाने सरपंचाच्या पती व नातेवाइकाला कार्यालयातच येण्यास बंदी केली आहे. तसेच कामात हस्तक्षेप आढळून आल्यास थेट कारवाई करण्याचा निर्णय घेतला या निर्णयाची अमलबंजावणी होणे महत्वाचे झाले आहे.

अनेक महिला सभापती व सरपंचांमध्ये नेतृत्वगुण असूनही त्या महिला सरपंचांना केवळ समाजाचा आणि पतीचा मान राखण्यासाठी नाइलाजास्तव "सहीबाई' म्हणून काम करावे लागते. खरे तर अशा निर्णयाची अमलबजावणी पुवीच व्हायला हवे. पुरुषी संस्कृतीला चाप बसून अनेक महिलांनी आपले नेतृत्व सिद्ध केले असते.

**नवराच कारभारी...**

बहुतेक ग्रामपंचायतींमध्ये,जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये आरक्षणामुळे महिलांना सदस्य, सरपंच, सभापती होण्याचा मान मिळतो. त्यावेळी अपवादात्मक पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीमध्ये महिला पतीचा हस्तक्षेप असतो. परंतु,आज महिलाही जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचा कारभार सांभाळण्यास सक्षम झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असून त्या कारभार सांभाळण्यास सक्षम होत आहेत,ही समाधानाची बाब आहे.

## आरोग्य संस्था बालरोग तज्ज्ञांविना;शस्त्रक्रिया आहे, औषधी आणून द्या!

### चिमुकल्यांचा जीव धोक्यात : भविष्यातील धोका ओळखण्याची गरज




### माता-बालकांकडे दुर्लक्षच

**गर्भवती आणि प्रसूत माता तसेच बाळ सुदृढ राहावे, याकरिता शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने त्याकरिता कोट्यवधींचा निधी देखील खर्च करण्यात येतो. मात्र त्याच माता आणि बालकांकडे जिल्ह्यात दुर्लक्ष होत आहेत. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये सर्व सुविधायुक्त असतानाही तिथे प्रसुतीचे प्रमाण नगण्य असे आहे. उठसूट रेफर टू गंगाबाईचा शेरा मारून त्यांना गोंदियाला पाठविण्यात येते. मग नेमकी ती यंत्रणा रुग्णालयांना पुरविली तरी कशाकरिता असा सवाल उपस्थित होत आहे. आजचे बालक उद्याचा देशाचा भविष्य असताना त्यांच्या उपचाराकरिता तज्ञ नसल्याने रुग्णालयात असलेले बीएएमएस डॉक्टर त्यांच्यावर उपचार करत आहेत.**

**गोंदिया:-** कोरोनाची पहिली आणि दुसऱ्या लाटेमुळे आरोग्य व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली गेली. कुठे खाटा होत्या, तर ऑक्सिजन नाही आणि ऑक्सिजन आहे तर औषधे आणि डॉक्टर नाही, अशी स्थिती बघावयास मिळाली. आता स्थिती सावरली आहे. जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये बालरोग तज्ञच नसल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. त्यामुळे येणारा संभाव्य धोका रोखणार कसा? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे.

गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण जगाला कोरोना विषाणूने कवेत घेतले. भारतात आणि महाराष्ट्रात देखील कोरोना संक्रमणाने कहर केला. पहिल्या लाटेत गोंदिया जिल्ह्यात फारसा परिणाम जाणवला नाही. मात्र दुसऱ्या लाटेने अक्षरशः जिल्ह्यात मृत्यूचे तांडव बघावयास मिळाले. पहिल्या लाटेनंतर दुसरी लाट येणार असल्याची माहिती शासन आणि प्रशासनाला होती. मात्र त्यावर उपाययोजना करण्यात यंत्रणा कमी पडली. परिणामी आलेल्या दुस?्या लाटेने अक्षरशः तारांबळ उडाली. खाटा, ऑक्सिजन, औषधे यांची कमतरता दिसून आली. त्याचा ताण आरोग्य संस्था आणि तेथे कार्यरत मनुष्यबळावर झाला. परिणामी अनेकांना उपचाराअभावी जीव गमवावा लागला. दुसरी लाट देखील ओसरून वर्ष लोटले. मात्र कोरोना वगळता देखील रुग्णालयांत बालरोग तज्ञांची नितांत गरज आहे. असे असताना रुग्णालयांत बालरुग्णांकरिता डॉक्टरांची व्यवस्था नाही. जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र ४०, आरोग्य उपकेंद्र २५८ आणि ग्रामीण रुग्णालये १० आहेत. मात्र यापैकी एकाही रुग्णालयात बालरोग तज्ञ नसल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. सर्वच संस्थांमध्ये बालरोग तज्ञ नसल्यामुळे जिल्हा प्रशासनाची ऐनवेळी धांदल उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बाई गंगाबाई स्त्री रूग्णालयाच्या अफलातून सेवेने कळस गाठले आहे. रूग्णांची हेळसांड आणि लुबाडणूक या पलीकडे लिंकगचाही कारभार होत आहे. प्रसुतीसाठी आलेल्या महिलेच्या कुटूंबाला तुमच्या रूग्णांची शस्त्रक्रिया होत आहे. यासाठी आवश्यक औषधी आणून द्या, असा फर्मान वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून काढतात. दरम्यान रुग्णांच्या कुटूंबाला पर्यायाने रात्र अहोरात्र रुग्णालयात सक्रिय असलेल्या औषधी विक्रेत्यांच्या दलालांना बळी पडावे लागत आहे.

हा सर्व प्रकार उघडपणे सुरू असला तरी वैद्यकीय महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समिती कान, डोळ्यावर हात ठेवून आलबेल दर्शवित आहे. त्यामुळे बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाच्या सेवेवर प्रश्नचिन्ह कायम आहेत. वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय या दोन्ही यंत्रणेचे स्वतंत्र औषध भंडार आहे. रुग्णालयांना लागणारी औषध भांडारातून उपलब्ध केली जाते. मात्र आवश्यक त्या औषधी शासनाकडून पुरवठा होत नाही. त्यामुळेच रुग-णांच्या नातेवाईकांना बाहेर औषधी मागवून घ्यावे लागते. असे बाई गंगाबाई रुग्णालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याने सांगितले आहे. त्यामुळे शासनाने या बाबीची चौकशी करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.

जिल्ह्यातील एकमेव बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय ढिसाळ, कर्मचाऱ्यांचा अफलातून कारभार, रुग्णांची हेळसांड आणि पैशाची लुट याशिवाय भौतिक सोयी-सुविधांना घेवून समस्यांचे माहेरघर झाले आहे.

हे रुग्णालय शासकीय असले तरी रुग्णाच्या कुटूंबाना खिशात पैसे ठेवूनच सेवेचा लाभ घ्यावा लागतो. पावलोपावली पैसे मोजावे लागते. हा गैर कारभार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकडून होत असल्याचा कांगावा मात्र रुग्णालय प्रशासन नेहमीच करीत असतो. त्यातही आपल्याकडे कसलीही तक्रार नाही तर कारवाई कशी करावी? असा प्रश्न उपस्थित करुन या सर्व गैर प्रकारातून प्रशासनातील अधिकारी सोयीस्कर अंग काढून घेतात. मात्र रुग्णांना लागणाऱ्या औषधी आणि शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या औषध खासगी औषध विक्रेत्यांकडून पुरवठा करून घेण्यासाठी रुग्णांना बाध्य केले जात आहे. याला जबाबदार कोण? असा प्रश्नही आजही कायम आहे.

रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या महिलेच्या कुटूंबाला शस्त्रक्रियेपुर्वीच औषधीची यादी दिली जाते. जोपर्यंत औषध उपलब्ध होणार नाही, तोपर्यंत शस्त्रक्रिया होणार नाही. असा इशारात्मक सुचना महिलेच्या कुटूंबाला दिली जाते. रात्र असो की दिवस शस्त्रक्रिया करायची असेल तर औषधी बाहेरुन आणावी लागेल, रुग्णालयात औषध उपलब्ध नाही. असे सांगितले जाते. यामुळे रुग्णालय प्रशासनाच्या लिकींगमध्ये असलेल्या औषध विक्रेत्यांच्या सक्रिय दलालांच्या लुबाडणूकीला रुग्णांच्या कुटूंबाला समोर जावे लागते.

विशेष म्हणजे, शस्त्रक्रियेसाठी लागणारी औषध जवळपास १२०० ते १५०० रुपयाची असते. एखादा गरीब कुटूंब असला तर त्याला औषधीचा खर्च भागविण्यासाठी अहोरात्र धडपड करावी लागते. हे रुग्णालय शासकिय कसे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## संपादकीय

# वन नेशन,वन युनिफार्म

भारत हा विविधतेतून नटलेला व विविध जातीधर्मियांना सामावून घेणारा देश आहे. जगाच्या पाठीवर असलेल्या २३१ देशांमध्ये विविधतेतून एकता असा संदेश देणारा भारत हा एकमेव आहे. भारत देश २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेशांमध्ये सामावलेला आहे. त्या त्या राज्यामध्ये विशिष्ट प्रवाहाचे रहिवासी गुण्यागोविंदाने नांदत असले तरी ते सर्वप्रथम देशाचे नागरिक आहेत. मग राज्य, शहर व त्यानंतर त्यांच्या गावाचे रहिवासी आहेत, हे बालवयापासूनच मनावर बिंबवले जात असल्याने ज्या ज्या वेळी देशाच्या सार्वभौमत्वाचा, अस्तित्वाचा, मानसन्मानाचा विषय निघतो, त्यावेळी देश प्रथम हा विचार प्रभावी ठरतो. आपण सर्वप्रथम भारतीय ही भावनाच भारतीयांच्या नसानसात आजही भिनलेली आहे; परंतु हीच देशाप्रतीची भावना प्रत्येक ठिकाणी दिसणे आज काळाची गरज आहे. विविधतेतून एकता आचरणात आणणे आवश्यक आहे. नाहीतर मुखी विविधतेतून एकता आणि राज्याराज्यांचा कानोसा घेतल्यावर एकतेत विविधता असे चित्र कोणा बाहेरील शक्तीला दिसता कामा नये, ही देशाच्या अखंडतेसाठी, सार्वभौमत्वासाठी घातक बाब आहे.

आज देशातील २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशामध्ये सर्वच स्तरावर एकता दिसावी, त्यामुळे प्रशासकीय पातळीवर समानता असावी यासाठी २०१४ साली केंद्रात सत्तेवर आलेल्या नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने प्रयत्न सुरू केले आहेत. मायबाप जनतेने स्पष्टपणे बहुमत दिलेले असताना नरेंद्र मोदी यांनी एकमताने निर्णय घेण्याला प्राधान्य न देता सर्वसहमतीने, विचारविनिमयाने निर्णय घेतले आहेत. त्यातून जनतेचा विश्वासही संपादन होतो. त्यामुळेच २०१९ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये भारतवासीयांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दाखवित भाजपकडे पुन्हा सत्तेचे सुकाणू सोपविले आहे. देशामध्ये असलेल्या विविध राज्यांमधील पोलिसांचे गणवेश पाहता एकतेत विविधतेचा गणवेशाच्या बाबतीत प्रत्यय येत आहे. यावरच प्रकाशझोत टाकताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोलिसांसाठी "एक देश, एक गणवेश' ही संकल्पना मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील पोलिसांच्या गणवेशावर नुकतेच भाष्य केले आहे. "एक देश, एक पोलीस गणवेश' या संकल्पनेवर राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी चर्चा करावी, असे आवाहन करताना कायदा आणि सुव्यवस्था ही राज्यांची जबाबदारी आहे. मात्र ती देशाची एकता आणि अखंडतेशीदेखील जोडली गेली आहे, असे पंतप्रधानांनी यावेळी सांगताना जबाबदारी पालनाचे निर्देशही एकप्रकारे अधोरेखित केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली देशभरातील विविध राज्यांचे गृहमंत्री आणि पोलीस महासंचालकांचे दोन दिवसांचे चिंतन शिबीर हरियाणातील सुरजकुंड येथे आयोजित करण्यात आले होते. या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षेसंबंधित अनेक विषयांवर मंथन करण्यात आले. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभाग घेतला होता. यावेळी बोलताना त्यांनी पोलिसांसाठी "एक देश, एक गणवेश' ही संकल्पना मांडली. त्यानंतर देशभरात या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली आहे. देशभरातील पोलिसांची ओळख सारखीच असायला हवी. पोलिसांसाठी "एक देश, एक गणवेश' ही केवळ कल्पना आहे. मी ते तुमच्यावर लादण्याचा प्रयत्न करत नाही. हा फक्त एक विचार आहे. हे कदाचित पुढच्या काही वर्षांत घडू शकते. सर्व राज्यांनी यावर विचार करायला हवा, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना केले आहे. या पूर्वी केंद्र सरकारकडून अशा प्रकारच्या काही घोषणा करण्यात आल्या होत्या. ऑगस्ट २०१९ मध्ये केंद्र सरकारकडून "एक देश, एक रेशन कार्ड' ही योजना लागू करण्यात आली होती. तर गेल्या ऑगस्ट महिन्यात केंद्र सरकारकडून "एक देश एक खत' ही घोषणा करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांनी या पूवी "एक देश, एक निवडणूक' घेण्याची कल्पनाही मांडली होती. भारतीय संविधानानुसार पोलीस दल आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्था हे राज्य सरकारांच्या अखत्यारीत येतात. देशातील प्रत्येक राज्याचे स्वतःचे पोलीस दल आहे.

साधारणत: भारतातील पोलिसांचा गणवेश खाकी रंगाचा असतो. मात्र, प्रत्येक राज्यानुसार या गणवेशात बदल होऊ शकतो. राज्य सरकार किंवा पोलीस दल स्वत:ही पोलीस कर्मचाऱ्यांचा गणवेश ठरवू शकतात. कायदा आणि सुव्यवस्था एखाद्या राज्यापुरती मर्यादित नाही, कारण गुन्हेगारी आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाढत आहे. यामुळे राज्य आणि केंद्रातील यंत्रणांनी समन्वय साधण्याची गरज आहे. जोपर्यंत या मुद्द्यांवर पोलीस आणि केंद्रीय संस्थांकडून समान प्रतिसाद मिळत नाही आणि याविरोधात लढण्यासाठी ते एकत्र येणार नाहीत, तोपर्यंत या समस्येला तोंड देणे अशक्य असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांच्या निदर्शनास आणून दिले आहे. "एक देश, एक गणवेश' ही संकल्पना मांडताना त्यामागचा विचार मोदी यांनी अधोरेखित केला.

देशभरातील पोलिसांची ओळख एकसमान असू शकते, असे मला वाटते. हे पाच, ५० किंवा १०० वर्षांतही घडू शकते; पण आपल्याला याबाबत विचार करायला हवा, असे मोदी म्हणाले. मोठ्या प्रमाणावर वापर होणार असल्याने याद्वारे गुणवत्तापूर्ण उत्पादनांची निर्मिती सुनिश्चित केली जाईल. शिवाय कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांना समान ओळख मिळेल, कायदा आणि सुव्यवस्था एखाद्या राज्यापुरती मर्यादित नाही, कारण गुन्हेगारी आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाढत आहे. यामुळे राज्य आणि केंद्रातील यंत्रणांनी समन्वय साधण्याची गरज आहे. जोपर्यंत या मुद्द्यांवर पोलीस आणि केंद्रीय संस्थांकडून समान प्रतिसाद मिळत नाही आणि याविरोधात लढण्यासाठी ते एकत्र येणार नाहीत, तोपर्यंत या समस्येला तोंड देणे अशक्य असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी यांनी आपल्या दुरदृष्टीचा देशवासीयांना पुन्हा एकवार प्रत्यय आणून दिला आहे.

# "हॅलो नव्हे-वंदे मातरम"

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त राज्यभरात "हॅलो नव्हे-वंदे मातरम" या अभियानाचा शुभारंभ झाला. या अभियानाविषयी...

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात दि. २ ऑक्टोबरपासून "हॅलो नव्हे-वंदे मातरम" या अभियानाचा शुभारंभ झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यभरात हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजेच गांधी जयंती दिनीच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ वर्धा येथून झाला.

"जनगणमन"हे आपले राष्ट्रगीत आणि "वंदे मातरम" हे राष्ट्रीय गाणे हे सर्वमान्य झाले आहे. आजही अनेक शासकीय कार्यालयांत संपर्क साधल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्या संवादास "हॅलो" या शब्दाने सुरुवात होते. काही ठिकाणी "जय हिंद" तर काही ठिकाणी "नमस्ते" असेही संबोधले जाते. शासकीय कार्यालयातील दूरध्वनीवरून होणारे संवाद व समोरासमोरुन आल्यानंतर होणारे संवाद यामध्ये जर "वंदे मातरम"हा शब्द वापरला तर त्याला एक प्रकारचे राष्ट्रीय स्वरूप येऊ शकते,

"वंदे मातरम" हा फक्त नारा किंवा संबोधन नसून राष्ट्रभक्तीचा जाज्वल्य इतिहास आहे. "वंदे मातरम" बाबत प्रचार-प्रसार व जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी या गीताचा इतिहास व त्याच्याशी निगडित घटना यांचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

वंदे मातरम हे गीत बंकिमचंद्र चटर्जी यांनी १८७५ या वर्षामध्ये लिहिले होते. संस्कृत भाषेतील हे मूळ गीत पाच कडव्यांचे होते. मात्र सध्या पाचपैकी फक्त एक कडवेच गायले जाते. १८९६ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात हे गीत सर्वप्रथम गायले गेले. १९०५ ला झालेल्या बंगालच्या फाळणी दरम्यान, "वंदे मातरम" हा परवलीचा शब्द होता. अनेक क्रांतिकारकांनी या गीताचा उद्घोष करत बलिदान दिले. "इन्कलाब जिंदाबाद" व "वंदे मातरम" या दोन शब्दांनी स्वातंत्र्य चळवळ भारावून गेली होती. या गीतावर व त्याच्या गायनावर इंग्रजांनी बंदीही घातलेली होती. मात्र तत्कालीन राजकीय पक्ष, क्रांतिकारक व सर्वसामान्य नागरिक यांनी ही बंदी झुगारून वंदे मातरम गायनास सुरुवात केली होती.

स्वातंत्र्य चळवळीतील धगधगत्या अग्निकुंडात बलिदान देणाऱ्या अनेक वीरांच्या मुखातून "वंदे मातरम" हा शब्द आला होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मंत्र ठरलेले हे गीत सर्वमान्य होते. दिनांक १४ ऑगस्ट १९४७ रोजी झालेल्या संविधान परिषदेच्या बैठकीची सुरुवातही या गीताने झाली होती.

१९५० मध्ये तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी "वंदे मातरम" या गीताबद्दल पुढीलप्रमाणे नमूद केले होते :

"शब्दों व संगीत की वह रचना जिसे जन गण मन सम्बोधित किया जाता है, भारत का राष्ट्रगान है; बदलाव के ऐसे विषय, अवसर आने पर सरकार अधिकृत करे और वन्दे मातरम गान, जिसने कि भारतीय स्वतन्त्रता संग्राम में ऐतिहासिक भूमिका निभायी है; को जन गण मन के समकक्ष सम्मान व पद मिले। (हर्षध्वनि)। मैं आशा करता हूँ कि यह सदस्यों को सन्तुष्ट करेगा। (भारतीय संविधान परिषद, द्वादश खण्ड, २४-०१-१९५०).

या विधानावरून या गीताची महती स्पष्ट होते. मद्रास उच्च न्यायालयाने शाळा व महाविद्यालये यांमधून "वंदे मातरम" हे गीत देशभक्तीची भावना रुजविण्याकरिता आठवड्यातून किमान एकदा तरी गायले जावे, असा निर्णय दिला होता. थोडक्यात "वंदे मातरम" हा शब्द सर्वांसाठीच प्रेरणादायी व सन्माननीय आहे.

"हॅलो नव्हे-वंदे मातरम" या अभियानाबाबत बोलताना मंत्री श्री.मुनगंटीवार म्हणतात की, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना स्वातंत्र्य लढ्यातील दिशादर्शक आणि क्रांतीचे निदर्शक असणाऱ्या या गीताच्या सुरुवातीच्या दोन शब्दांनी म्हणजेच "वंदे मातरम" ने शासकीय कार्यालयातील दूरध्वनी संभाषणाची सुरुवात व्हावी, अशी जनसामान्यांची इच्छा होती. त्यास अनुसरून हा निर्णय घेण्यात आला आहे. आजही अनेक शासकीय कार्यालयात संपर्क साधल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्या संवादास हॅलो या शब्दाने सुरुवात होते. काही ठिकाणी "जय हिंद' तर काही ठिकाणी नमस्ते असेही संबोधले जाते. वास्तविक पाहता दोन व्यक्ती एकमेकांशी होणाऱ्या संवादात, सुरुवातीस संबोधित करताना वेगवेगळी अभिवादने वापरताना आढळून येतात. महाराष्ट्रात "नमस्कार' व "राम राम' हे दोन शब्द आजही मोठ्या प्रमाणात संबोधनात्मक वापरण्यात येतात. त्याशिवाय हॅलो, हाय, गुड मॉर्निंग सारखे शब्दही दिसून येतात. वेगवेगळे समूह, समुदाय, धर्म यांमध्येही अभिवादन करण्याच्या विविध प्रथा आहेत. वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात या प्रथा सर्वजण आपापल्या परीने जोपासत आहेत व त्या जोपासण्याचा त्यांना अधिकारही आहे. शासकीय कार्यालयात किंवा शासन व्यवहारात दूरध्वनीवरून किंवा समोरासमोर भेटल्यानंतर कोणत्या शब्दाने अभिवादन करावे याबाबत स्पष्ट निर्देश कुठेही उपलब्ध नाहीत. त्यामुळे शासकीय कार्यालयातील दूरध्वनीवरून होणारे संवाद व समोरासमोरून आल्यानंतर होणारे संवाद यामध्ये जर "वंदे मातरम" हा शब्द वापरला तर त्याला एक प्रकारचे राष्ट्रीय स्वरूप मिळेल असे मला वाटते.

लघु चित्रपटाच्या माध्यमातून "वंदे मातरम" बाबत जाणीवजागृती करण्यात येणार आहे. "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयांबरोबर निमशासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित व विना अनुदानित कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत उपक्रम व आस्थापना यांना कार्यालयात दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनीवर अभ्यागत व सहकारी यांना संवाद साधण्याच्या सुरुवातीस हॅलो असे न म्हणता "वंदे मातरम" असे अभिवादन करावे, असे आवाहन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने केले असून, यासाठीची काही मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे नमूद केली आहेत.

सर्व शासकीय कार्यालयांत दूरध्वनीवर/ भ्रमणध्वनीवर अभ्यागत किंवा अधिकारी/कर्मचारी यांनी संवाद साधल्यास सुरुवातीचे अभिवादन म्हणून "हॅलो" संबोधन न वापरता, वंदे मातरम" म्हणावे.

२. शासकीय कार्यालयांबरोबरच निमशासकीय कार्यालये, शासन सहाय्यित/अनुदानित/ अर्थसहाय्यित व इतर स्वरूपाचे साहाय्य असणारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा/ महाविद्यालये व शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत सर्व प्रकल्प/उपक्रम/आस्थापना येथील कार्यालयांतही दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीवर अभ्यागत किंवा सहकारी यांनी संवाद साधल्यास, सुरुवातीला "हॅलो" असे न म्हणता "वंदे मातरम" असे संबोधन करावे. तसेच त्यांनी त्यांच्या वैयक्तिक भ्रमणध्वनीवरही संवाद साधतांना "वंदे मातरम" असे संबोधन करावे.

कार्यालय/संस्था येथे दूरध्वनीवरून होणाऱ्या संवादात सुरुवातीस "वंदे मातरम" हे संबोधन वापरले जाईल यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी सर्व अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहित करावे.

४.कार्यालयात/संस्थांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांनाही सार्वजनिक जीवनात "वंदे मातरम" ने संबोधन करण्याबाबत जाणीव जागृती करावी.

५.ज्या ठिकाणी स्वयंचलित दूरध्वनी यंत्रणा अस्तित्वात आहे त्या ठिकाणीही हा बदल करण्यात यावा.

६. विविध बैठका / सभांमध्ये वक्त्यांनी "वंदे मातरम" या शब्दांनी संभाषणाची सुरुवात करावी.

**- वर्षा फडके-आंधळे**
**वरिष्ठ सहायक संचालक**
**(माहिती)**

# "बळीराजा हे मानवतावादी, समतावादी राज्यकर्ते होते"-नागेश चौधरी



नागपूर-: बळीराजा हे मानवतावादी, समतावादी राज्यकर्ते होते. त्यांच्या मानवतावादी सद्गुणाचा, विषमतावादी बटु वामनाने तीन पाऊल जमीन मागण्याच्या निमित्ताने घात केला. तसेच या देशात वर्ण व जातींची उतरंड असलेली विषमतेने ग्रासलेली जातवर्ण व्यवस्था बळजबरीने लादून भारतातील मानवतावादी, समतावादी मूल्ये संपुष्टात आणण्याचे काम वामनांनी केले, असे परखड मत बहुजन विचारवंत नागेश चौधरी यांनी व्यक्त केले. ते संविधान चौकात सत्यशोधक समाज, बहुजन संघर्ष समिती व इतर समविचारी संघटनांच्या वतीने आयोजित "महात्मा बळीराजा महोत्सवात" प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक समाज, नागपूर शाखेचे अध्यक्ष टेमराज माले होते.

प्रारंभी स्थानिक कॉटन मार्केट चौक नजिक असलेल्या म.फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळयांना माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक काळातील बळीराजाचे समतावादी विचाराचे वारस असल्याने त्यांना अभिवादन करुन बळीराजाचे स्मरण करण्यात आले,

इडा पीडा जावो आणि बळीचे राज्य येवो! अशी आराधना करणाऱ्या आमच्या पूर्वजांनी जपून ठेवलेल्या बळीराजाच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. जयघोष करण्यात आला. विषमतावादी वामनी विकृतीचा धिक्कार करण्यात आला. त्यानंतर ताफा संविधान चौकाकडे रवाना होऊन सुरवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केल्यानंतर अभिवादन सभा पार पडली. महात्मा बळीराजा यांचा उत्सव सार्वजनिकरित्या सुरू करण्याची संकल्पना दिवंगत माजी आमदार आ.ला.वाघमारे यांनी १९८७ मध्ये मांडली व ती आज संपूर्ण भारतात उत्साहात साजरी होत आहे, असेही नागेश चौधरी यांनी सांगितले. विषमतेवर मात करण्यासाठी बळीराजाला अभिप्रेत असलेला विचार समाजात रुळल्याशिवाय समता व मानवता रूजणार नाही, असेही ते नागपूर बळीराजा उत्सवात म्हणाले.

बलिप्रतिपदा म्हणजे बळीराजाचे स्मरण करण्याचा सण. भारतीय संस्कृतीत बळीराजा न्यायी, दानशूर, सद्गुणी म्हणून विख्यात आहे. बळीचे राज्य अर्थात समतेचे,न्यायाचे राज्य. बळीचे राज्य म्हणजे स्त्रीपुरुष विषमता, जातीभेद, वर्णभेद रहित राज्य. अशा महादानशूर, संविभागी बळीराजाची आठवण दिवाळीला-बलिप्रतिपदेला बळीराजाचे वारस, शेतकरी आयाबहिणी

इडापीडा जावो।
बळीचे राज्य येवो।।
असे स्मरण करत असतात.

यादिवशी दरवषी बळीराजा उत्सवही मोठ्या उत्साहाने अनेक ठिकाणी साजरा करण्याची परंपरा रुढ होत आहे. यानिमित्ताने नागपूरला दिनांक २६ ऑक्टोबर २०२२ ला बळीराजा उत्सव साजरा करण्यात आला. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या सुषमा भड, शरद वानखेडे, सत्यशोधक समाजाचे बाबा बिडकर, अनुज हुलके व टेमराज माले यांनीही यावेळी बळीराजाच्या महत्तेवर प्रकाश टाकला. "इडा पिडा टळो, बळीचे राज्य मिळो","वामन राज हटायेंगे, बली राज लायेंगे", "वामन राज हटायेंगे, बहुजन राज लायेंगे" अशा बुलंद घोषणांच्या निनादात कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमात अशोक ठाकरे, दिवाकर वर्षे, विनोद उलीपवार, सुरेश मानमोडे, मिलिंद पखाले, गणेश नाखले, संजय मांगे, माधुरी सेलोकर, सुषमा रामटेके, प्रकाश दुलेवाले, प्रकाश पाठराबे, देवेंद्र बोकडे, श्रीरंग मदनकर, सुरेश कुथे, नरेंद्र सहस्त्रबुध्दे, राजू बोचरे, कुमूद वर्षे, मीरा मदनकर, गोविंद वरवाडे, यांच्यासह अनेक समतावादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**देवरी,दि.०१-** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने स्थानिक मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय येथे (दि. ३१) राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे हे होते. यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. देशाची एकता व अखंडता मजबूत करण्यासाठी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.यावेळी बोलताना प्रा. झिंगरे म्हणाले की, स्वातंर्त्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातील राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रम म्हणजे देश अखंडित व सक्षम बनविण्याची व सुजाण नागरिक घडविण्याची एक सुवर्णसंधी आहे.कार्यक्रमात राष्ट्रीय एकता दिवस शपथ घेण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने विद्याथी-विद्याथीनी उपस्थित होते. रीनेश्वरी हिरवानी ,बी ए तृतीय या विद्याथीनीने एकता दिवस शपथेचे वाचन केले.आभार पायल मडावी या विद्यार्थिनीने मानले.

### निवृत्तीधारकांना हयातीचा दाखला सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर,** चंद्रपूर महानगरपालिकेतील सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी तथा कुटुंब निवृत्तीधारकांनी हयातीचा दाखला भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा,चंद्रपूर येथून प्रमाणित करून महानगरपालिकेतील लेखा विभागात तसेच सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व कुटुंब निवृत्तीधारकांनी त्यांच्या हयातीचा दाखला बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर येथून प्रमाणित करून महानगरपालिकेतील शिक्षण विभागात दि. ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करावेत.

# शासकीय हमी भाव खरेदी केंद्र सुरु न केल्यास लवकरच आंदोलन करु-माजी आमदार जैन



**गोंदिया-** तालुक्यातील अर्जुनी येथे दिवाळीच्या पावन पर्वावर मंडई निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी माजी आमदार जैन यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच लोककलेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कला अबाधित राखण्यासाठी रसिकांनी प्रामाणिक साथ द्यावी असे माजी आमदार श्री जैन म्हणाले.

शेतकऱ्यांच्या धानाची मळणी चालू झाली असून शेतमाल शेतात पडून आहे. सरकारने अजूनही शासकीय हमी भाव धान खरेदी केंद्र सुरु केलेले नाहीत ते लवकरात लवकर सुरू करण्यात यावे. तसेच प्रति एकरी २० क्विंटल धान खरेदीची मर्यादा वाढवून देण्यात यावी. परतीच्या पावसामुळे व अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतक-यांच्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सरकारने केलेले नाही. शेतक-यांना २४ तास विद्युत उपलब्ध करून शेतक-यांच्या थकीत कृषी पंपाचे बिल माफ करण्यात यावे यासारख्या अनेक शेतकरी व सामान्य हिताच्या मागण्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने सरकार कडे केल्या असून त्या मागी न लावल्यास खा.प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात पुन्हा मोठे आंदोलन करण्यात येईल असे प्रतिपादन राजेंद्र जैन यांनी केले.

या उद्घाटन प्रसंगी सर्वश्री राजेंद्र जैन, केतन तुरकर, अखिलेश सेठ, सरितताई सहारे, नितीन तुरकर, ओमकार रहांगडाले, लताताई पटले, उषाताई पटले, भुनेश्वरी बिसेन, खिलेश्वरीताई तुरकर, चित्रलेखा बिसेन, पृथ्वीराज रहांगडाले, मिश्राजी विवेक भैय्या, हरीणखेडेजी, शंकर गौतम, शंभुजी पटले, माणिकलाल गौतम, रेखनलाल तुरकर, गौतम, विजय रहांगडाले, चंद्रशेखर मुकेश पटले, किशोर रहांगडाले, सेवकराम खैरवार, लिल्हारेजी सहित मोठ्या संख्येने गावातील नागरिक उपस्थित होते.

# दादालोरा खिडकीतंर्गत शिलाईमशीन योजनेचा आदिवासी मुलींना लाभ



**चिचगड,-**पोलीस ठाणे अंतर्गत सशस्त्र दूरक्षेत्र बोंडेच्यावतीने दादालोरा खिडकी योजने अंतर्गत शिलाई मशीनचे प्रशिक्षण घेतलेल्या आदिवासी मुलींसाठी शिलाई मशिन मिळावे याकरीता आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत कागदपत्र सादर करुन सहकार्य करण्यात आले.आदिवासी समाजातील म्हैसुली येथील मुलींना पोलीस विभागाच्या दादालोरा योजनेतंर्गत विविध योजनांची माहितीही देण्यात आली.तसेच बिचटोला येथील २ मुलींना रहिवासी प्रमाणपत्र मिळवून देण्यात आले.याकरिता सशस्त्र दूरक्षेत्र बोंडे येथील पोलीस उपनिरिक्षक राहुल दुधमल व पोलीस अंमलदार यांनी विशेष सहभाग घेतला. नवनियुक्त गोंदिया पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी सशस्त्र दुरक्षेत्र, बोंडे येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे केलेल्या कार्याबद्दल कौतुक केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२६ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# भारत जोडो यात्रा आणि पापक्षालन




देशात अस्वस्थता पसरली आहे. महागाईने कष्टकरी जनतेला हैराण केले आहे. बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड वाढल्याने युवा वर्ग अस्वस्थ आहे. शेतकरी जिवापाड मेहनत करुनही हाताशी काही लागत नाही. आयात निर्यात धोरण शेतकरी हीत लक्षात घेऊन वापरले जात नसल्याने हातात आलेल्या पिकांना योग्य भाव मिळत नाही. शासन प्रशासनात संख्या प्रमाणात योग्य प्रतिनिधित्व मिळत नसल्यामुळे ओबीसी आरक्षणासाठी उठाव करत आहे,जातवार जनगणनेसाठी संघर्ष करीत आहे.

देशभरातील ओबीसी मोर्चे, धरणे, निदर्शने च्या माध्यमातून योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नसल्याचा, नोकऱ्या मिळत नसल्याचा राग व्यक्त करत आहे. ओबीसी अस्मिता धारदार होत आहे. स्त्रीयांच्या सन्मानाचे धिंडवडे उडवले जात आहे. कोरोना काळाने आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याची नितांत गरज असल्याचे अधोरेखित झालेले आहे. लाखो लोकांचे रोजगार गेलेले आहेत. असे लोकांना अस्वस्थ करणारे महत्त्वाचे प्रश्न असताना धर्मद्वेषाचे अमानवी राजकारण देशात चाललेले आहे. भोंगा, चालीसा, हिजाब , मंदिर मशीद इत्यादी मानसा-मानसांमध्ये द्वेषाचे विष पेरण्याच्या स्क्रिप्ट एकामागून एक येत आहे. लोकशाहीच्या सर्वच खांबांनी लोकांना असहाय्य अवस्थेत सोडून दिल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर राहुल गांधींनी काढलेल्या भारत जोडो पदयात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. शेतकरी आंदोलनाप्रमाणेच या यात्रेला मेनस्ट्रीम मिडिया दुर्लक्षित करीत असला तरी शेतकरी आंदोलन आणि भारत जोडो यात्रा आंदोलनांच्या माध्यमातून जागतिक विक्रमी फोकनाड्यांना, विक्रमी आंदोलनाने ठोसा देण्याचा लोकांचा इरादा स्पष्ट होत आहे.

विविध सत्यशोधकी विचाराच्या सामाजिक, सांस्कृतिक संघटना भारत जोडो यात्रेकडे पक्षीय दृष्टीने न पाहता, जनतेचं आंदोलन म्हणून पाहत आहेत. तळागाळातील शेतकरी, कष्टकरी, ओबीसी, दलित, आदिवासी इत्यादी जातिव्यवस्थेचे बळी ठरलेले जातीसमुह या आंदोलनात सहभागी होताना दिसत आहे. हिंदुत्वाच्या नावावर मुस्लिम, ख्रिश्चन द्वेष पेरुन ज्या ओबीसींना आजपर्यंत वापरलं, त्या ओबीसी युवकांना आपण फसवले गेल्याचे लक्षात यायला लागले. रोजगार आणि शासकीय नोकऱ्यांपासून ओबीसींना मोठ्या प्रमाणात फटका बसल्याचे पुढे आले. शेंडी जानव्यापुरत्या हिंदुत्वाने ओबीसींचे मोठे नुकसान केल्याचे आकलन ओबीसी शेतकरी युवकांना होऊ लागले. त्यातून जातवार जणगणना आणि लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधित्वाचे आंदोलन देशभर फोफावत आहे. या आंदोलनाचा धसका घेऊन पापक्षालनाची भाषा पुढे आली. म्हणून खरेच त्यांना पापक्षालनाची जाणीव झाली की, ओबीसींच्या भोळेपणाचा वापर करायचा आहे, हे जाणून घ्यावे लागेल. काहीही असो परंतु जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि धर्म व्यवस्थेच्या माध्यमातून त्यांनी महापाप केल्याचे जाहीर कबूल केले, हा मुद्दा आपल्यासाठी महत्वाचा आहे.

महात्मा फुले यांच्या "शेतकऱ्याचा असूड", या पुस्तकात पापक्षालनाच्या संदर्भात आलेली नोंद खालीलप्रमाणे आहे.

आर्य विद्वज्जनास, जर खरोखर या देशांतील सर्व लोकांची एकी करून या देशाची उन्नती करणें आहे, तर प्रथम त्यांनी आपल्या विजयी व पराजितांमधील चालत आलेल्या दुष्ट धर्मास जलसमाधी देऊन, त्या जुलमी धर्माने नीच केलेल्या शूद्रादि अतिशूद्र लोकांसमक्ष उघड रीतीने, आपल्या वेदांत मतांसह जातीभेदाचे उरावर थयथय नाचून कोणाशी भेदभाव न ठेविता, त्यांच्याशी कृत्रीम करण्याचे सोडून निर्मळपणे वागू लागल्याशिवाय सर्वांची खरी एकी होऊन या देशाची खरी उन्नती होणे नाही. (संदर्भ-महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले महात्मा फुले समग्र वाङ्मय)

महात्मा फुले यांनी सुचविलेली ही पापक्षालनाची भूमिका स्विकारुन पापक्षालन करता येऊ शकते. अन्यथा कधी महाकाय वामनाचं रुप घेणे, कधी बंब्या बटुवामनाचे रुप घेणे, याप्रकारातलच ते सोंग ठरेल.

६० टक्के ओबीसींना त्यांच्या सर्व क्षेत्रात ६० टक्के हक्कांचा वाटा प्राप्त झाला पाहिजे ही भूमिका घेऊन पापक्षालन करता येऊ शकते. असं काही न करता ओबीसींना मुस्लिमांच्या विरोधात भडकावणारा विकृत हिंदुत्ववादी विचार पेरणे आणि मुस्लिम धर्म गुरुंना भेटणे यातून पापक्षालन कसे होईल? परशुराम आणि वामनाला आदर्श मानत कृरता आणि कपटाचे समर्थन करणारे तशी शिकवण देणारे, तसे वागणारे पापक्षालन कसे करणार? समतावादी बळीराजाची माफी मागून, बळीराजाचा सन्मान करुन, त्याची सन्मानाने मिरवणूक काढून, वामनाला खलनायक घोषित करुन पापक्षालन करणे शक्य आहे. ओबीसींची जातवार जनगणना करुन प्रशासनात, न्यायव्यवस्थेत, मंदिर व्यवस्थेत, प्रत्येक जातीचा संख्या प्रमाणात सहभाग करुन पापक्षालन करणे शक्य आहे. सर्व जगाचा ब्राम्हण गुरू आहे म्हणायचे आणि वरुन जातीभेद संपला पाहिजे म्हणायचे, याला पापक्षालनाची भूमिका म्हणता येत नाही. बहुजनांची फसवणूक करणारी सोंगटी भूमिका आहे.

**जय सत्यशोधक**
**बाबा बीडकर**

# वन विभागाच्या जागेतून ३०० ब्रास मुरुमाचे अवैध खोदकाम करुन वाहतूक



**तिरोडा :** गोंदिया जिल्ह्याच्या तिरोडा तालुक्यातील इंदोरा सहवनक्षेत्र ठाणेगाव येथील गट क्रमांक ७३८ वन विभाग विभागाच्या जागेतून ३०० ब्रास मुरुमाचे अवैध खोदकाम करून वाहतूक संबंधित वन अधिका?्यांच्या संगनमताने करण्यात आलेले आहे. याबाबत मौका पंचनामा २० ऑक्टोबर २०२२ रोजी तिरोडा वनपरिक्षेत्र अधिकारी आर.जी. मून व महसूल अधिकाऱ्यांनी केलेला आहे. सदर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न संबंधित वन अधिकारी करीत असल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडालेला आहे, असा आरोप पत्रकार राजेशकुमार तायवाडे यांनी केलेला आहे.

या प्रकरणाकडे वन मंत्री व पालक मंत्री सुधीर मुंगटीवार यांनी गांभीर्याने लक्ष देऊन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविणा?्या वन अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. तसेच खोदकाम करून घेऊन जाणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करावी जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे प्रकरण घडणार नाही व शासनाचा महसूल बुडविण्याचा कोणीही वन अधिकारी प्रयत्न सुद्धा करणार नाहीत, अशी तक्रार राजेशकुमार तायवाडे यांनी केलेली आहे.

तसेच सदर ठिकाणावरून खोदकाम करण्यात आलेला मुरुमाचा वापर कोणत्या ठिकाणी करण्यात आलेला आहे, याची जाणीव तिरोडा वनपरिक्षेत्र अधिकारी आर.जी. मून यांना माहिती असून सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांनी अज्ञात आरोपीविरुद्ध वन कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हातून स्थानिक चौकशी केल्यावर माहीत होईल की, एवढ्या मोठ्या प्रमाणात मुरुमाचा अवैधपणे खोदकाम करून वाहतूक कोणत्या ठिकाणी करून मुरुमाचा वापर करण्यात आलेला आहे. मात्र याची जाणीव वनपरिक्षेत्र अधिकारी आर.जी. मून यांना माहिती असून सुद्धा सदर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न संबंधित अधिकारी करीत आहेत, असा आरोप पत्रकार राजेशकुमार तायवाडे यांनी केलेला आहे.

### अवैध खोदकाम

त्यांनी सदर प्रकरणाची तक्रार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते अजित पवार, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्री (वने) यांचे खासगी सचिव, जिल्हाधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षण (वनबल प्रमुख) नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षण (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) नागपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षण (प्रादेशिक) नागपूर, मुख्य वनसंरक्षण (प्रादेशिक) महाराष्ट्र राज्य, नागपूर, उपवनसंरक्षक, उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी तिरोडा, तहसीलदार तिरोडा यांना केलेली आहे.सदर प्रकरणात योग्य कार्यवाही करण्यात आलेली नाही तर गोंदिया उपवनसंरक्षक कार्यालयासमोर उपोषणावर बसण्यात येईल, असा इशारा पत्रकार राजेशकुमार तायवाडे यांनी दिलेला आहे.

# रुग्णवाहिका चालक ८ महिन्यांपासून वेतनविनाच



**गोंदिया–** राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत जिल्ह्यातील सर्वच प्राथमिक केंद्रांना रुग्णवाहिका पुरविण्यात आल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या रुग्णवाहिकांच्या चालकाचे नियोजन एका कंत्राट कंपनीच्या माध्यमातून केले जाते. मात्र गेल्या ८ महिन्यापासून रुग्णवाहिका चालकाच्या कंत्राट कंपनीचा तोडगा निघालेला नाही. त्यामुळे रुग्णवाहिका चालक ८ महिन्यापासून वेतनविनाच सेवा पुरवित आहेत. चालकाची दिवाळीही देखील अंधारात गेली. सातत्याने वेतन मिळत नसल्याने चालकांपुढे कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

आरोग्य क्षेत्रामध्ये रुग्णवाहिका हे महत्वाचे साधन झाले आहे. जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिका पुरविण्यात आले आहे. यात १०२ क्रमांकाची सेवेचा समावेश आहे. या क्रमांकावर संपर्क करणाऱ्या गरोदर माताना रुग्णवाहिकेची सेवा पुरविली जाते.

एवढेच नव्हेतर या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून इतर रुग्णांचे ने–आण केली जाते. रुग्णवाहिकांच्या चालकाचे कर्तव्याचे नियोजन गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राट कंपनीच्या माध्यमातून होत आहे. परंतु, गेल्या काही महिन्यापासून कंत्राट कंपनी नियुक्त करण्यात आलेली नाही. तर दुसरीकडे रुग्णवाहिका चालकांची सेवा कायम ठेवण्यात आली आहे. संसर्गाच्या काळातही रुग्णवाहिका चालकांनी जीवाची पर्वा न करता सेवा पुरविली. तुटपूंज्या मानधनातून रुग्णवाहिका चालक कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. मात्र गेल्या ८ महिन्यांपासून जिल्ह्यातीलच काय राज्यातील कंत्राटी रुग्णवाहिका चालकांचे वेतन देण्यात आलेले नाही. किंबहुना या संदर्भात आरोग्य विभागाकडून कसलेही पाऊल उचलण्यात आले नाही.

आज ना उद्या वेतन मिळणार, या आशेवर रुग्णवाहिका चालक सेवा पुरवित असताना दिवाळी सारखा सण ही अंधारात गेला आहे. सलग ८ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने रुग्णवाहिका चालकांपुढे कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे संतापलेले रुग्णवाहिकेचे चालक तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

# अनियंत्रित वाहन पार्किंगला जबाबदार कोण?



**गोंदिया–** दिवसेंदिवस शहरातील बाजारापेठेतील रस्त्यांवर वाढते अतिक्रमण व त्यावर होणारी वाहतूक कोंडी, अनियंत्रित पार्किंग व्यवस्था आदि समस्या डोकेदुखीचे ठरत आहे. यावर कायमचा तोडगा काढण्यासाठी जिल्हा पोलिसांनी ऑगस्ट महिन्यात पार्किंगचा अँक्शन प्लान तयार केला. दिवाळी सणापुवी प्लॅनची अंमलबजावणी सुरू केली. मात्र अवघ्या दोन दिवसातच गोंदिया शहरातील वाहतूक कोंडी व पार्किंग व्यवस्था जैसे थेच्या परिस्थितीत पहावयास मिळत आहे. त्यामुळे या अनियंत्रित पार्किंगला जबाबदार कोण? असा सवाल सुज्ञ नागरिकांकडून उपस्थित करीत आहेत.

गोंदिया शहरातील अनियंत्रित पार्किंग आणि रस्त्यावरील व्यापाऱ्यांचे वाढते अतिक्रमणामुळे होणाऱ्या वाहतुकीची कोंडी ही नागरिकांसाठी सर्वात मोठी समस्या आहे. या समस्येला नागरिकच समोर जात नसून वाहतूक पोलिसांना देखील मोठी डोकेदुखी करून घ्यावी लागते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गोंदिया पोलिसांनी ऑगस्ट महिन्यात पार्किंगचा अँक्शन प्लान तयार केला. या प्लॅनची अंमलबजावणी वाहतूक पोलिस निरीक्षक महेश बन्सोडे यांनी दिवाळीपूर्वी सुरू केली. दरम्यान शहरातील ४२ रस्त्यांचा पार्किंग व्यवस्थेला घेवून वेळापत्रकही जाहिर केला. एवढेच नव्हेतर रस्त्यांच्या दोन्ही बाजुला पार्किंगला व्यवस्थेच्या वेळापत्रकानुसार तारखांचे फलकही लावले. शिवाय पोनि महेश बन्सोडे हे खुद्द रस्त्यावर उतरून व्यापाऱ्यांच्या अतिक्रमण आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र अवघ्या दोन दिवसात व्यापारी असो की नागरिक किंवा या अरेरावी पणाला समोर जाणारी पोलिस यंत्रणा यांच्या बेजबाबदारपणामुळे अँक्शन प्लानचे तिनतेरा वाजले आहेत. पार्किंग व्यवस्थापनाच्या वेळापत्रकाची उघडपणे पायमल्ली करून रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभे केली जात आहेत. त्याच प्रमाणे नो–पार्किंग झोनमध्ये दुचाकी, चारचाकी वाहने आज पार्किंग केलेली पहावयास मिळाली.

# शिक्षक आमदार निवडणूकीत काँग्रेस शब्द पाळणार का?

**नागपूर :** नागपूर विभागीय पदवीधर निवडणुकीच्या ऐतिहासिक विजयानंतर महाविकास आघाडीला बारा वर्षांपासून भाजपच्या ताब्यात आसलेला शिक्षक मतदारसंघ जिंकण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. विशेष म्हणजे, पदवीधर निवडणुकीदरम्यान काँग्रेस आणि शिक्षक भारतीमध्ये छुपी युती झाल्याची माहिती आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी दिलेला शब्द शिक्षक मतदार संघासाठी पाळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेस किंवा महाविकास आघाडीने अद्यापही शिक्षक मतदारसंघासदर्भात कुठलीही भूमिका जाहीर केलेली नाही. तर दुसरीकडे काँग्रेसचे नेते डॉ. बबनराव तायवाडे यांच्या निकटवर्ती सुषमा भड यांना कास्ट्राईब महासंघाने शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी दिल्याने नवीन चर्चांना ऊत आला आहे.

आमदार अॅड. अभिजित वंजारी यांना पदवीधर मतदारसंघातून विजयी करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सर्वच नेत्यांनी एकत्रित प्रयत्न केले होते. काँग्रेस विचारांच्या सर्व संघटनांची मनधरणी केली होती. मतविभाजन टाळण्यासाठी अनेक उमेदवारांना उमेदवारी मागे घेण्यास सांगितले होते. यावेळी शिक्षक मतदारसंघातही काँग्रेस इतर संघटनांना मदत करेल अशा शब्द देण्यात आला होता.

शिक्षक भारती आणि काँग्रेसमध्ये तशी बोलणीही झाली होती अशी माहिती आहे. यंदा शिक्षक भारतीने राजेंद्र झाडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे काँग्रेस शिक्षक भारतीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर करेल अशी चर्चा होती. यासंदर्भात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चाही झाल्या आहेत.

मात्र, अद्यापही यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे आता काँग्रेस पदवीधर निवडणुकीत दिलेला शब्द पाळणार का? अशी चर्चा सुरू आहे. काँग्रेस आणि शिक्षक भारतीमध्ये बोलणी सुरू असताना अचानक काँग्रेस नेते बबनराव तायवाडे यांच्या निकटवर्ती असलेल्या सुषमा भड यांना कास्ट्राईब महासंघाने उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे हा काँग्रेसचा छुपा अजेंडा तर नाही ना? अशीही शंका उपस्थित केली जात आहे. विधान परिषदेच्या नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघात जानेवारी २०२३ मध्ये निवडणूक होत आहे. यासाठी मतदार नोंदणी सुरूझाली असून सर्वच शिक्षक संघटनांनी निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. पदवीधर निवडणुकीमध्ये आमदार कपिल पाटील समर्थित शिक्षक भारती संघटनेचे उमेदवार किशोर वर्भे यांना माघार घ्यायला लावण्यात आली होती. त्यावेळी शिक्षक मतदारसंघात मदतीची बोलणीही झाली होती असे वर्भे यांनी सांगितले. मात्र, अद्याप यावर निर्णय झालेला नाही. मागील निवडणुकीमध्येही काँग्रेसने ऐन वेळेवर उमेदवार देऊन शिक्षक भारतीच्या मतांची विभागणी केली होती. याचा फायदा गाणार यांना झाला होता. यंदाच्या निवडणुकीत अशी चूक टाळण्याचा प्रयत्न काँग्रेसने करावा, अशी मागणी होत आहे.

# आरोग्य कर्मचारी विना अर्जाने गैरहजर

## तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयातील प्रकार

**अर्जुनी मोरगाव:–** नियमानुसार प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांना रजा घेताना तसा अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे. मात्र तालुका वैद्यकीय कार्यालयातील कर्मचारी विना अर्जानेच गैरहजर असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विना अर्जाने गैरहजर राहणाऱ्या कर्मचायांवर कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे.

अर्जुनी मोर तालुका आदिवासीबहुल, नक्षलग्रस्त, दुर्गम व गोंदिया जिल्हा व राज्याच्या शेवटच्या टोकावर वसला आहे. येथील ग्रामीण भागातील गोरगरिब जनतेला ते आरोग्य सुविधा मिळावी म्हणून येथे शासनाने तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयाची निर्मिती केली. येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. मात्र कर्मचारीच त्यांच्या कर्तव्याला फाटा देत जनतेच्या सोयी सुविधा व आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे येथील तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयात २७ ऑक्टोबर रोजी प्रतिनिधीने भेट दिल्यावर दिसून आले. येथील तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयात ९ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र येथे आवश्यक कार्यरत कर्मचारी कर्तव्यावर दिसून न आल्याने प्रतिनिधीने तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय राऊत यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधत माहिती घेतली असता कार्यरत २ कर्मचाऱ्यांसह आपण गाव भेटीवर असल्याचे त्यांनी सांगितले. लेखापाल एस.एम.तिवारी, कार्यक्रम सहाय्यक डी. बी. बोकडे व तालुका समूह संघटक, आशा हे कार्यालयात रजेचा अर्ज न टाकता गैरहजर असल्याची माहिती कनिष्ठ सहाय्यक एम. एस. खंडाईत यांनी दिली. जे कर्मचारी विना अर्जाने गैरहजर असतील त्या कर्मचाऱ्यांची हजेरी रजिस्टरवर गैरहजर नोंद अशी नोंद करुन त्यांचा पगार कपात करण्यात येणार असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले. या प्रकारावरुन शासकीय कर्मचारी रजेच्या अर्जाविनाच कार्यालयात गैरहजर राहत असल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉ. राऊत हे त्यांच्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे बोलले जात असून गैरहज राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# माकडीच्या सरपंच यांच्या अपात्रतेच्या निर्णयाला स्थगनादेश

**गोंदिया :** तालुक्यातील माकडीच्या सरपंच त्रिवेणी भरत हनवते यांना अप्पर आयुक्त यांनी अपात्र ठरविले होते या निर्णयाविरोधात सरपंच हनवते यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपील केले असता न्यायालयाने सरपंच पद– अपात्रतेवर स्थगनादेश दिला आहे. माकडी ग्राम पंचायतची निवडणूक फेब्रुवारी २०१८ मध्ये झाली.

सरपंच म्हणून त्रिवेणी हनवते या निवडून आल्या. मात्र त्यांचे सासरे मदन–लाल हनवते यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याने सरपंच त्रिवेणी हनवते यांना अपात्र ठरविण्यात यावे, अशी तक्रार कृष्णकुमार नागपुरे, कमलाप्रसाद तुरकर, आसाराम करचाल आदींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.

अप्पर आयुक्त नागपूर यांनी तक्रारीवर निर्णय देत सरपंच त्रिवेणी हनवते यांना अपात्र ठरविले. या निर्णयाविरोधात सरपंच हनवते यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपील केली. यावर न्यायालयाने त्यांच्या अपात्रतेच्या आदेशाला तुर्तास स्थगनादेश दिला आहे.

# फ्रिडम रायडर चे भंडारा मध्ये भव्य स्वागत; ७५ बाइकर्सचा २५ हजार किलोमीटर प्रवास




**भंडारा, दि. १ :** आरोग्य व शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश देणाऱ्या ७५ बाइकर्सचा ताफा २५ हजार किलोमीटरच्या प्रवासादरम्यान भंडारा शहरात रविवारी पोहचला. भंडारा येथील क्रीडा प्रेमींनी धाडसी प्रवास्यांचा उत्साहात स्वागत केले. केंद्र व राज्य शासनामार्फत स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सव अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

स्वातत्र्यांच्या अमृत महोत्सव निमित्ताने भारतीय खेल प्राधिकरण ऑल इंडीया मोटरबाइक एस्पिटिशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील ७५ बाइकर्स हे देशातील ऐतिहासीक स्थळांना भेटी देणार असून या रॅलीच्या माध्यमातून विविधतेतील एकता असणाऱ्या संस्कृतीचे दर्शन घडविणार आहेत. या रॅलीच्या माध्यमातून हे सर्व ७५ बाइकर्स स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सव साजरा करतांना आरोग्य आणी फिटनेसचा संदेश प्रसारीत करुन भारतीय वारसा तसेच संस्कृती यावर एक माहितीपट तयार करण्यात येणार आहे.


ही मोहीम ७५ दिवसांची असून देशातील ३४ राज्य व केंद्रशासित प्रदेशामधील एकूण २१,००० कि.मी.च्या प्रदेशामध्ये ही मोहीम चालविणार आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात ७५ इळझश ठळवशी यांचे खासदार सुनिलजी मेंढे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश पाटील, अतिरीक्त पोलीस अधिक्षक अनिकेत भारती, भारतीय खेळ प्राधिकरणाचे सहाय्यक संचालक श्रीनिवास माळेकर, सहाय्यक संचालक सुमेध तरोळेकर, वरिष्ठ मार्गदर्शक आशिष बॅनर्जी, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, तहसिलदार अरविंद हिंगे, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक हितेंद्र वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत बाइकर्सचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. या प्रसंगी जिल्हयातील एकविध क्रीडा संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू व नागरीक उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षाच्या अंदाजित वेळापत्रक

गडचिरोली–: सन –२०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आले आहे. शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता आयोगामार्फेत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते, त्यानुसार सन– २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहेत.

# दहा वर्षांपासून शिक्षक भरती बंद, डीएडधारकांनी करावे तरी काय



**गोंदिया–** शासकीय भरती बंद असल्यामुळे शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवकळा आली आहे. दहा वर्षांपासून शिक्षक भरती बंद केली आणि आता शाळा बंद करण्याचे नियोजन सुरू केले असल्यामुळे शिक्षण वर्तुळात खळबळ उडाली आहे.विद्यार्थ्यांचे आयुष्य पणास लागले आहे. अनेक शाळांमध्ये पाच ते सात शिक्षकांची आवश्यकता आहे, त्या शाळेत केवळ दोन आणि तीन शिक्षक असल्याचे चित्र आहे.

शिक्षकांना शिकवण्याबरोबरच स्कॉलरशिप प्रशिक्षण व पंधरवडा सप्ताह राबविण्यासह इतर सर्व ऑनलाइनची कामे करावी लागतात. जिल्हा परिषद शाळांसह स्थानिक स्वराज्य संस्था खासगी स्तरावरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील रिक्त पदे मोठ्या प्रमाणात आहेत. शासन शिक्षक भरती करण्यास उदासीन आहे. दहा वर्षांपासून शिक्षक भरती होत नसल्याने अध्यापक, पदविका, पदवी पात्रताधारक बेरोजगारांचे जगणे मुश्कील झाले आहे. काय करावे? असा प्रश्न त्यांना पडला आहे. पदवी घेऊन पदवी, पदविकाधारक बेरोजगारांनी काय करावे? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा तसेच खासगी शाळेतील अनेक पदे रिक्त आहेत.

शेकडो शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत, त्यामुळे शिक्षकांची सुमारे हजारांवर पदे रिक्त आहेत. दहा वर्षांपासून भरती प्रक्रिया होत नसल्याने शिक्षक, अध्यापक, पदविका, पदवीधारकांनी आता रस्त्यावर चहा विकायचा का? असा संतप्त सवाल या डीटीएड, बीएड पात्रधारक बेरोजगार भावी शिक्षकांनी उपस्थित केला आहे.

### जिल्ह्यात आता केवळ ५ डीएड कॉलेज

**जिल्ह्यात डीएडची ८ कॉलेज होती. त्यापैकी तीन कॉलेज बंद झाली आहेत. आता जिल्ह्यात पाच डीएड कॉलेज आहेत. ११०० जागा एकूण आहेत.**

### दरवर्षी २५० शिक्षक बाहेर पडतात त्यांचे काय ?

**शासनाच्या शिक्षण विभागाची भरती बंद असल्याने त्याचा परिणाम डीएड कॉलेजवर झाला आहे. त्यामुळे ७० टक्केच अॅडमिशन झाले आहे. नोकरी मिळत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही. दहा वर्षांपासून शिक्षक भरती नाही. त्यामुळे खासगी कॉन्व्हेंटवर अल्पशा मानधनावर डीएड झालेल्या भावी शिक्षकांना काम करावे लागते.**

### दहा वर्षांपासून भरती नाही

**राज्यात २०10 नंतर शिक्षक भरती झाली नाही. २०17 मध्ये पवित्र पोर्टलमार्फत प्रक्रिया सुरूझाली; परंतु तीही अद्याप अपूर्ण आहे.शिक्षक भरती प्रक्रियेत मध्यंतरी घोळ झाला होता. त्यामुळे सुपेसह इतरांनाही अटक होऊन ती प्रक्रिया लांबलेली होती. डीटीएड, बीएडधारकांची संख्या मोठी असून, शिक्षक पदभरती होत नसल्याने बेरोजगारीच्या संख्येत दरवषी वाढ होत आहे.**

### कोणी कंपनीत नोकरी करतो, तर कोणी हॉटेलात

**दहा वर्षांपासून शिक्षक भरती बंद असल्याने पदवीधारक बेरोजगारांनी करावे काय, असा यक्ष प्रश्न त्यांच्यापुढे उभा ठाकला आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी मिळेल ते काम करून ते पोट भरत आहे. कुणी खासगी कंपनीत नोकरीला आहे तर कोणी हॉटेलात काम करतो आहे तर अनेक भावी शिक्षक शेतात मजुरीला कामाला जात असल्याचे चित्र आहे.**

**मी २०10 मध्ये डीएड पास झालो; परंतु अद्यापही नोकरी मिळाली नाही. वय निघून जात आहे, त्यामुळे मिळेल ते काम करावे लागत आहे. कुटुंबाची जबाबदारी आहे. शेतीत जाऊन शेतीची कामे आणि दूध वाटण्याचे काम करीत आहे.**

**– पंढरी पाल, (डीएड, उमेदवार)**

**दहा वर्षांपासून शिक्षक भरती नाही. हजारो जागा रिक्त आहेत. शासन डीएड, बीएडधारकांची भरती करत नाही. त्यामुळे बेरोजगारी वाढत आहे. परिणामी कॉन्व्हेंटमध्ये चार हजार रुपये महिना पगारावर नोकरी सुरूआहे. त्यात काय होणार, तुम्हीच सांगा.**

**– पराग बनकर, (डीएड, उमेदवार)**

# माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहिमेत महिलांनी आरोग्य तपासणी करून घ्यावी-जिल्हाधिकारी



**गोंदिया:–** राज्यात एक लाख गर्भवती महिलांपैकी ३८ महिलांचा गरोदरपणात किंवा प्रसुतीवेळी मृत्यू होतो. दुसरीकडे, दरवर्षी १७ ते २० हजार बालकांचा (० ते ५) मृत्यू होतो. या पार्श्वभूमीवर महिला विशेषत: गर्भवती महिला व मुली १८ वर्षावरील सुरक्षित राहाव्यात, त्यांचे आरोग्य सुदृढ असावे, यासाठी नवरात्री उत्सवापासुन “माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियान जिल्ह्यात सुरूआहे.

कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना नोकरी व्यवसाय सांभाळणाऱ्या महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्पर्धा हेच त्यामागील मुख्य कारण मानले जात आहे. फास्ट (जंक) फूड खाण्याची क्रेझ, व्यायाम नाही, अवेळी व अपुर्ण जेवण, अपुरी झोप, अतिरिक्त कामाचा ताण यामुळे आरोग्याकडे लक्ष द्यायला सुद्धा महिलांना वेळ मिळत नसल्याची वस्तू स्थिती आहे. दुसरीकडे, अजूनही सर्वत्र विशेषत: ग्रामीण भागातील मुली, महिला मासिक पाळी बद्दल मोकळेपणाने बोलत नाहीत. समस्या देखील अनेक जण लपवितात. परंतु, तसे करणे भविष्यासाठी धोकादायक असल्याचे भान त्यांना करुन देण्याची गरज आहे.

गर्भाची वाढ न होणे, तसेच गर्भवतीचे वजन, उंची कमी असल्याने प्रसुतीवेळी अडचणी निर्माण होतात. सृष्टीची निर्माता समजली जाणारी ती सुरक्षित राहावी या उद्देशाने हे अभियान यशस्वीपणे राबवली जात आहे. महिल्यांच्या सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या या अभियानाचा १८ वर्षावरील मुलीं, महिलांनी लाभ घ्यावा आणि स्वत:चे आरोग्य सुरक्षित आहे का याची खात्री करावी, असे आव्हान जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी केले आहे.

माता सर्वात जास्त दु:ख, वेदना सहन करते. कौटुंबिक व नौकरी, शिक्षणाच्या व्यापातून त्यांना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. पण या अभियानातून त्यांना तणावमुक्ती व मन: शांतीसाठी योगा, व्यायाम करा, जंकफुड न खाता घरात बनवलेले पोष्टिक जेवण खा, पुरेशी झोप, आराम करा, फळे खाण्याचा सल्ला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

जिल्ह्यात “माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियानात आतापर्यत एक लाख ६४ हजार ६०४ महिलांची, २२ हजार ९४९ गरोदर मातांची आरोग्य तपासणी झाल्याची माहिती डॉ. दिनेश सुतार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली आहे.

### आरोग्याची अशी घ्या काळजी

**✻ पौष्टिक आहार घ्यावा, खजूर, शेंगालाडू, पालेभाज्या खाव्यात, आरोग्य केंद्रातून मोफत लोहयुक्त गोळ्या घ्या.**

**✻ दररोज कमीत कमी ४० मिनिटे व्यायाम करावा, सूर्यनमस्कार, योगा, पायी चालावे.**

**✻ रक्तक्षय टाळण्यासाठी मोबाईलचा अतिवापर नको, व्यायाम करा आणि पुरेशी झोप घ्या.**

**✻ महाविद्यालय मुलींनी जंक फूड, थंड पेये घेऊ नये, सायकलीवरून कॉलेजला जावे.**

**✻ गरोदर मातेने पहिले सात महिने दर महा,पुढील दोन महिने पंधरा दिवसाला, शेवटी आठवड्यातून एकदा आरोग्य तपासणी करावी.**

### महात्मा जनआरोग्यमधून मोफत उपचार

**गर्भवती मातांना किंवा इतर महिला, मुलींना राज्य शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत तीन लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार घेता येतो. त्याअंतर्गत जवळपास तेराशे आजारांचा समावेश आहे. उपचाराचा खर्च वाढल्यास केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेतून पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतात. ङ्गमाता सुरक्षित तर घर सुरक्षितफ अभियानातून गंभीर आजार होऊ शकणाऱ्या किंवा झालेल्या महिलांचा शोध घेऊन त्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.**

### अभियानातील आतापर्यंतची निरीक्षणे

**✻ रक्तक्षय (अँनिमिया), थायरॉईडची (पुढे जाऊन गर्भधारणेस अडथळा होतो) समस्या**

**✻ मासिक पाळीत अनियमितता, श्वेतप्रदरची लक्षणे**

**✻ अनेकांना मधुमेह, उच्च रक्तदाबाची सुरुवात झाल्याचे दिसून येते**

**✻ स्तन व तोंडाच्या कर्करोगाची लक्षणे, गर्भाशयाच्या मुखासंबंधी अनेक समस्या**

**✻ कामाच्या व्यापात महिला करतात स्वत:च्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष**

# गोंदियावासियांसाठी औटघटकेची ठरली फ्लायबिगची विमानसेवा




## गोंदियाच्या राजकीय नेत्यांचे सर्वात मोठे अपयश,श्रेयाच्या लढाईत सकारात्मक विकासाकडे मात्र कानाडोळा

**गोंदिया :** येथील बिरसी विमानतळावरून जवळपास सात ते आठ वर्षांच्या कालावधीनंतर उड्डाण प्रकल्पांतर्गत १३ मार्च २०२२ पासून प्रवासी विमान वाहतूक सेवेला प्रारंभ झाला होता.मात्र या विमानतळावरून ही सेवा चालविण्याचे कंत्राट घेतलेल्या फ्लाय बिग कंपनीने देखभाल दुरुस्तीच्या नावावर करार संपण्यापूर्वीच आपला गाशा ऑगस्ट महिन्यात गुंडाळला. त्यामुळे या विमानतळावरून सुरू झालेली प्रवासी विमान वाहतूक सेवा ही औट घटकेची ठरली.

गोंदिया तालुक्यातील बिरसी येथे तत्कालीन केंद्रीय विमान वाहतूकमंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारले होते. तसेच या ठिकाणी पायलट प्रशिक्षण केंद्र सुरू सुद्धा करण्यात आले. मात्र पटेल आपल्या कार्यकाळात याठिकाणाहून प्रवासी विमानसेवा सुरु करु शकले नव्हते.त्यांनी यासाठी प्रयत्न केले असते तर आधीच विमानसेवा सुरु झाली असती मात्र आत्ता खा.मेंढे यांच्या प्रयत्नाने सुरु झालेल्या प्रवासी विमानसेवेला मात्र दुरुस्तीच्या नावावर जरी बंद करण्यात आले असले तरी राजकीय श्रेयवादाची लढाईच असल्याचे बोलले जात आहे.

या विमानतळावरून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरूकरण्याची बाब मागील चार-पाच वर्षांपासून विचाराधीन होती. त्यानंतर केंद्र आणि राज्य शासनाच्या उड्डाण प्रकल्पांतर्गत विमान सेवा सुरू करण्यासाठी खा. सुनील मेंढे यांनी पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यशसुद्धा आले. नोएडा येथील फ्लाय बिग या खासगी विमान कंपनीने बिरसी विमानतळावरून प्रवासी वाहतूक सेवा करण्याचे कंत्राट घेतले. १३ मार्चपासून २०२२ या विमानसेवेला प्रारंभ करण्यात आला. गोंदिया-इंदोर-हैदराबाद या विमानसेवेला सुरुवात करण्यात आली. त्याला प्रवाशांचासुद्धा चांगला प्रतिसाद मिळत होता.

प्लाय बिग कंपनीने ऑक्टोबरपर्यंत या विमानतळावरून विमान सेवा सुरू ठेवण्याचा करार केला. पण पाच महिन्यांच्या कालावधीतच ६ ऑगस्टपासून देखभाल दुरुस्तीच्या नावावर प्रवासी विमान वाहतूक सेवा बंद केली. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यासह लगतच्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यातील प्रवाशांसाठी ही सेवा औट घटकेची ठरली.

**प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज**

- बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ आहे. या विमानतळावरून प्रवासी व कागी सेवा सुरूकरण्याला वाव आहे. मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्य लागून आहे. शिवाय गोंदिया हे हावडा-मुंबई मार्गावरील एक महत्त्वपूर्ण रेल्वे स्थानक आहे. त्यामुळे या विमानतळावरून प्रवासी वाहतूक सेवेला चांगला वाव होता. पुन्हा ही सेवा पूर्ववत सुरूकरण्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि केंद्रात वजनाची गरज आहे.

**सेवा बंद करण्यासाठी देखभाल दुरुस्तीचा बहाणा**

- फ्लाय बिग कंपनीने ६ ते २१ ऑगस्ट दरम्यान विमानांच्या देखभाल दुरुस्तीचे कारण देऊन पुढे सेवा बंद राहणार असल्याचे सांगितले. मात्र २१ ऑगस्टनंतरही फ्लाय बिगने विमानसेवा सुरू केली नाही. विशेष म्हणजे विमानतळावरील त्यांच्या कार्यालयाचे साहित्यसुद्धा घेऊन गेले.

**विमानतळ प्राधिकरणाचे २ लाख रुपये शिल्लक**

- प्लाय बिग कंपनी विमानतळाच्या रनवेपर्यंत सामान पोहोचविण्यासाठी मार्च महिन्यापासून एक ट्रॅक्टर भाड्याने घेतले होते. या ट्रॅक्टरचा किराया जवळपास २ लाख रुपये शिल्लक असून तो अद्यापही फ्लाय बिग कंपनीने बिरसी विमानतळ प्राधिकरणाने जमा केला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**प्रवासी विमानसेवा सुरूहोण्याची आशा धूसर**

- बिरसी विमानतळावर नाइट लँडिंगसाठी आवश्यक असलेली एएलएस (ऑटोमॅटिक लँडिंग सिस्टीम) ही सेवा कोरोना काळातच विमानतळ प्राधिकरणाने या विमानतळावरुन काढून कोलकत्याला हलविली.त्यातच स्थानिय विमानतळ प्रशासनाने अनेकदा फ्लायबिग विमानाला उतरण्यासाठी हवामानाचे कारण देत उतरु दिले नाही.याउलट पायलट प्रशिक्षण विमानांना मात्र उडण्याची व उतरण्याची सेवा सतत सुरु ठेवण्यात आली होती.त्यामुळे सुध्दा फ्लायबीगकंपनीने विमानतळ प्राधिकरणाच्या असहकार्य भूमिकेमुळे हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. बिरसी विमानतळावरून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरु होण्याची शक्यता आता फार कमी असल्याचे बोलले जाते.

**प्रवासांची मुंबई-गोवा-कलकत्ता विमानाची मागणी**

जेव्ही की ही सेवा सुरु झाल्यानंतर गोंदिया,बालाघाट,डोंगरग़ड येथील प्रवाशानी मुंबई, पुणे, गोवा व कलकत्ता विमानसेवा सुरु करण्यासाठी खासदारांकडे आग्रह धरला होता. प्रवाशांच्या प्रतिसादही इंदोर गोंदिया हैद्राबाद विमानसेवेला असताना सेवा बंद होणे गोंदियाच्या राजकीय नेत्यांचे अपयश झाले आहे.

# शिक्षक पंतसंस्थेच्या निवडणुकीत सहकारी पॅनलचा एकहाती विजय, विकास पॅनलचे वर्चस्व संपुष्टात



**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षकांची अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणार्या प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्थेच्या निवडणुकीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. या निवडणुकीचा निकाल ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास जाहीर झाला आहे. दरम्यान शिक्षक मतदारांनी यावेळी गेल्या दोन दशकापासून पतसंस्थेवर वर्चस्व कायम ठेवलेल्या विकास पॅनलचा धुव्वा उडवित सहकार पॅनलने एकहाती विजय मिळविला. विशेष म्हणजे विकास पॅनलच्या पराभवासाठी प्राथमिक शिक्षक संघाचे झालेले दोन तुकडेच कारणीभूत ठरले. तर सहकार पॅनल असलेल्या शिक्षक समितीने मात्र एकी कायम ठेवल्याने संघ विरुध्द संघाच्या या लढाईत समितीने विजय मिळविला.

विकास पॅनलच्या सत्तारुढ संचालकावर झालेले आरोप आणि प्राथमिक शिक्षक संघातील मतभेदाचा लाभ घेत शिक्षक समितीच्या सहकार पॅनलला पतसंस्थेची सत्ता शिक्षकांनी सोपवत प्रास्थापित शिक्षक संघाच्या विकास पॅनलला धक्का दिला. विशेष म्हणजे संघर्ष पॅनलने चांगलेच समिकरण बिगडविले. शिक्षक समितीच्या सहकार पॅनलचे १३ पैकी ११ उमेदवार विजयी झाले तर संघाच्या विकास पॅनलला फक्त २ जागांवर समाधानी व्हावी लागले. यात संस्थेचे अध्यक्ष विरेंद्र कटरे यांनाही पराभवाचा धक्का सहन करावा लागला हे विशेष.

गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.ची निवडणूक अत्यंत चुरसीची पहावयास मिळाली. पंत संस्थेच्या एकूण १३ संचालक पदासाठी ४२ उमेदवारांनी भाग्य आजमाविले. विशेषतः प्रस्थापित प्राथमिक शिक्षक संघाचे विकास पॅनल शिक्षक समितीचे, शिक्षक समितीचे सहकारी पॅनल तर शिक्षक संघाचा एक गट व इतर संघटनांचा संयुक्त संघर्ष पॅनल या तिघांमध्ये लढत पहावयास मिळाली. ३० ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात एकूण ६ मतदान केंद्राच्या माध्यमातून मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. एकूण ३२३६ शिक्षक मतदार असलेल्या पत संस्थेच्या निवडणुकीसाठी २८६८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जवळपास ६० टक्के मतदान झाले. दरम्यान स्थानिक जे.एम. पटेल विद्यालयात मतमोजणीला सकाळी ८ वाजतापासून सुरुवात झाली होती. त्यामुळे मतमोजणी केंद्रासमोर सकाळपासून शिक्षक मतदार आणि उमेदवारांच्या समर्थकांची गर्दी पहावयास मिळाली. गोंदिया पंचायत समिती क्षेत्रातील मतांची मोजणी सुरु होताच सुरुवातीला शिक्षक संघाच्या विकास पॅनलच्या उमेदवारांनी आघाडी घेतली होती. तसेच तिरोडा आणि गोरेगाव या तीन पंचायत समिती क्षेत्रामध्ये विकास पॅनलच्या उमेदवाराने आघाडी घेतल्यामुळे मोठा उत्साह दिसून आला. मात्र उर्वरित ५ पंचायत समिती क्षेत्रातील शिक्षक मतदारांनी चक्क संघाच्या विकास पॅनलला नाकारून समितीच्या सहकारी पॅनलवर विश्वास दर्शविला. सायंकाळपर्यंत चाललेल्या मतमोजणी प्रक्रिये दरम्यान दुपारी ३ वाजेनंतर सहकारी पॅनलच्या उमेदवारांनी विकास पॅनलच्या सर्व उमेदवारांवर आघाडी घेतली. अखेर निकाल जाहीर होता, शिक्षक मतदारांनी प्रस्थापित शिक्षक संघाच्या पॅनलला चांगलाच धक्का दिल्यास समोर आले. प्रस्थापित पॅनलला फक्त दोन जागांवर समाधानी व्हावे लागले.संघर्ष पॅनलला एकही जागा मिळाली नसली तर या पॅनलने निवडणूक लढविल्यामुळे संघाला चांगलाच फटका बसल्याचे समोर आले.

### जिल्हास्तर विजयी उमेदवार

- ✻ इमाव प्रवर्ग- तिडके संदीप ईश्वरदास (सहकार पॅनल)
- ✻ अनु जाती/जमाती प्रवर्ग-बडोले विनोद पुरणदास (सहकार पॅनल)
- ✻ विभाज प्रवर्ग-बोपचे राजेंद्र मनिराम (सहकार पॅनल)
- ✻ महिला राखिव-डहाट नितू युवराज (विकास पॅनल)
- ✻महिला राखीव-तिडके भारती दिनेश (सहकार)

### पं.स.स्तरीय विजयी उमेदवार

- ✻ गोंदिया- बांते गौतम मधुकर (सहकार पॅनल)
- ✻ तिरोडा- बिसेन अशोक धोडुजी (सहकार पॅनल)
- ✻ गोरेगाव- रहांगडाले उमेश शिवनाथ (सहकार पॅनल)
- ✻ आमगाव- ठाकुर शोभेलाल धनलाल (सहकार पॅनल)
- ✻ देवरी- रामटेके राजेश आबाजी (विकास पॅनल)
- ✻ सालेकसा- दमाहे सत्यनारायण भिवराम (सहकार पॅनल)
- ✻ सडक अर्जुनी- डोंगरवार किशोर बाळा (सहकार पॅनल)
- ✻ अर्जुनी/मोर.- लोधी दिलीप श्रीराम (सहकार पॅनल)

# आरोग्यवर्धिनीत मिळणार मानसिक आरोग्य सेवा

**गोंदिया:** समाजातील अनेक स्तरावर मानसिक आजार हा कलंक नसून शारीरिकआजाराप्रमाणेच एक आजार आहे हे सर्वांना पटवून देणे गरजेचे आहे. तो दूर करण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्रात मानसिक आरोग्य सेवा देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली.




बदलती जीवनैशली, वातावरण, स्पर्धात्मक जीवन, अचानक उद्भवलेली महामारी, जगण्यातील अनिश्चितता आदीमुळे समाजात ताण, तणाव, भीती, नैराश्य, चिंता आदी मानसिक विकारांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्याचा परिणाम म्हणजे मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. अभ्यासामधून असे आढळून आले आहे की भारतामध्ये चार पैकी एक व्यक्ती हा त्याच्या जीवनामध्ये कुठल्या ना कुठल्या मानसिक समस्यांना सामोरे जातो. परंतु आपल्या समजात शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक आजारांना महत्व दिले जात नाही. मानसिक आजाराबद्दल समाजामध्ये सध्या तरी म्हणजे तितके जनजागृती, सकारात्मक आली नाही.

थोडक्यात सांगायचे झाले तर मानसिक, विकार, आजार हे दुर्लक्षित केले जातात. विशेषतः ग्रामीण भागामध्ये परंतु आरोग्यदायी समाजासाठी ही स्थिती बदलणे गरजेचे आहे. त्याकरिता आरोग्यवर्धिनी केंद्रावरील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक परिचारिका व बहुउद्देश्य कर्मचारी यांचे जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत मानसिक आरोग्य विषयी प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांनी दिली.

### मनशक्ती क्लिनिक उपक्रमाची उद्दीष्टे


**मानसिक समस्यांचे गांभीर्य बघता मानसिक आजारांवर विशेष लक्ष केंद्रीत करणे ही काळाची गरज बनली आहे. मानसिक आरोग्य सेवा शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्याकरिता मनशक्ती क्लिनिक उपक्रम जिल्ह्यात सुरु करण्यात येत आहे. सर्वांसाठी विशेषत: सर्वात असुरक्षीत आणि वंचितासाठी किमान मानसिक आरोग्य सेवेची उपलब्धता आणि सुलभता सुनिश्चित करणे, सामान्य आरोग्य सेवेमध्ये आणि सामाजिक विकासामध्ये मानसिक आरोग्य ज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, मानसिक आरोग्य सेवेच्या विकासामध्ये समुदायाचा सहभाग वाढवणे आणि समुदायांमध्ये मदतीसाठी प्रयत्नांना चालणा देणे.**

### मनोविकारांचे काही प्रकार

**भीती वाटणे, भ्रम होणे संशयी वृती वाढणे, विनाकारण आक्रमण होणे, शिवीगाळ करणे, स्वत:ची काळजी न घेणे, एकटेच सहणे-रडणे-बडबडणे-हातवार करणे, एकलकोंडेपणा, झोप न लागणे, विनाकारण अतिउत्साही आनंदी राहणे, अवाजवी जास्त बडबड करणे, अनावश्यक खर्च/प्रवास करणे, अतिक्रीयाशील होणे,झोपेची गरज न भासणे, सतत उदास, निराश वाटणे, कामात मन न लागणे, नकारात्मक विचार येणे, पुर्वीसारखा उत्साह न राहणे, भूक-झोप न लागणे, जीवन निरर्थक वाटणे, आत्महत्येचे प्रयत्न करणे, चिडचिडपण आदि मनोविकारांचे प्रमुख प्रकार आहेत.**

# तीन सायबरियन पक्षी आढळले जखमी अवस्थेत

**गोंदिया:** हिवाळ्याची चाहूल लागताच जिल्ह्यातील जलाशयांवर विदेशी पक्ष्यांच्या आगमनास सुरुसुवात झाली आहे. मात्र या जलाशयांवर विदेशी पक्षी सुरक्षित नाहीत. शनिवार, २९ ऑक्टोबर रोजी वनविभागाच्या पथकाने ३ सायबेरियन पक्षी जखमी अवस्थेत पकडले. उपचारानंतर त्यांना सुरक्षित स्थळी सोडण्यात आले. विदेशी पक्ष्यांची शिकार करण्यासाठी शिकारी सक्रिय झाल्याचे या प्रकारावरून दिसून येत असल्याची शक्यता वन विभागाने वर्तवली आहे.



तलावांचा जिल्हा म्हणूनणू गोंदिया ओळखला जातो. जिल्ह्यात गुलाबी थंडीला सुरुवात झाली आहे.याच काळात जिल्ह्यातील जलाशये, तलाव, पाणवठ्यांवर विदेशी पक्ष्यांचे आगमन होत असते.ते या पक्षांना पाहण्यासाठी जिल्ह्यातीलच नव्हे तर जिल्ह्याच्या सीमावती राज्यातूनतू पर्यटकय मोठ्या संख्येने जिल्ह्यात दाखल होतात. यंदाही ऑक्टोबरच्या दुस?या पंधरवाड्यात देशी व विदेशी पक्षांचे जिल्ह्यात जलाशयांवर आगमन सुरु झाले आहे. मात्र, मोठ्या संख्येने पक्षी येत असल्याने काही शिकारी या पक्ष्यांची शिकार करण्याचाही प्रयत्न करतात.तशा घटनाही समोर आल्या आहेत. गोरेगाव वन परिक्षेत्राच्या पथकाने गोरेगाव वन परिक्षेत्रांतर्गत तुमखेडा-ढिवरटोली वनक्षेत्रात सायबेरियन प्रजातीचे तीन पक्षी जखमी अवस्थेत पकडले. उपचारानंतर त्यांना सुरक्षित स्थळी सुखरूप सोडण्यात आले. यासंदर्भात वनविभागाच्या अधिका?यांनी सांगितले की, पक्ष्यांना इजा करण्याच्या उद्देशाने अज्ञातांनी सापळा रचला असावा किंवा काही साहित्याने त्यांना जखमी केले असावे. या प्रकारावरून पक्ष्यांच्या शिकारी साठी शिकारी सक्रिय झाल्याचे संकेत मिळत आहेत. अशा परिस्थितीत वनविभागाने या दिशेने तपास करून या शिकारींवरही करडी नजर ठेवण्याची मागणी होत आहे.

# २६ पैकी फक्त एकालाच शिक्षा






### २०१८ मध्ये सर्वाधिक २५ कारवाई

**लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सन २०१८ पासून केलेल्या कारवायांचे तक्ता बघितल्यास त्यात सन २०१८ मध्ये सर्वाधिक २५ कारवाया करण्यात आल्याचे दिसत आहे. मात्र, त्यानंतर घट होताना दिसत आहे. सन २०२१ मध्ये ११ कारवाया करण्यात आल्यानंतर सन २०२२ मध्ये परत ग्राफ चढला असून १४ कारवाया करण्यात आल्याचे दिसते.**

**गोंदिया:** काम करुन देण्यासाठी चहापाणीच्या नावावर पैसे घेणाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग दणका देत आहे. मागील पाच वर्षांत अशा प्रकारच्या ८८ कारवाई करण्यात आल्या आहेत. मात्र, आश्चर्याची बाब अशी की, यातील २६ प्रकरणांचा निकाल लागला असून फक्त एकालाच शिक्षा झाली आहे. तर १० जण निर्दोष ठरले आहेत.

एखाद्याचे काम करुन देण्यासाठी थेट पैशांची मागणी करण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. एक प्रकारे ही समाजात आता परंपराच झाली आहे. काम करायचे आहे तर पैसा लागणार हे सर्वांनाच ठाऊक आहे. यासाठी काम असलेली व्यक्तीसुद्धा तेवढी तयारी ठेवतो. मात्र, कित्येकांना पैसे खाऊ घालून काम करवून घेणे वाटत नाही. शिवाय काम करुन देण्यासाठी पैशांची मागणी करणे हा गुन्हा असून यावर अंकुश ठेवण्यासाठी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सज्ज आहे. यातूनच लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने जिल्ह्यात कित्येक कारवाया केल्या आहेत. सन २०१८ पासून म्हणजेच मागील ५ वर्षावर नजर टाकल्यास विभागाने जिल्ह्यात लाचखोरीच्या ८८ कारवाया केल्या आहेत. यामध्ये आतापर्यंत २६ प्रकरणात निकाल सुनावण्यात आला आहे. १० जणांना निर्दोष ठरविण्यात आले असतानाच आश्चर्याची बाब म्हणजे फक्त एकालाच शिक्षा सुनावण्यात आली आहे. आता येथे फक्त एकालाच शिक्षा सुनावण्यात आली म्हणजे येथे फक्त एकच लाचखोर असल्याचे दिसते.

### ०७ नोव्हेंबरला लोकशाही दिन

गोंदिया-जिल्हयामध्ये सर्व सामान्य जनतेसाठी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.०७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता लोकशाही दिनाचे कार्यक्रम जिल्हाधिकारी नयना गुंडे यांचे अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचे कडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागांचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबधी कार्यवाही करण्याचे निर्देश देतील.ज्या नागरीकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# विदर्भातील मत्सव्यवसाय रोजगाराभिमुख करणार-मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार

**नागपूर:** विदर्भात रोजगार निर्मितीच्यादृष्टीने मत्सव्यवसायाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, ममाफसूमयांनी त्या पद्धतीने कामाची दिशा ठरवून आराखडे तयार करावेत व मत्सव्यवसायाकडे बघावे, अशी सूचना पशू व मत्स्य विद्यापीठ नागपूर येथे आयोजित बैठकीत राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

विदर्भातील मत्स्यव्यवसाय विकास आणि गोड्या पाण्यातील मत्स्यपालन या विषयाचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. यावेळी भंडारा-गोंदीयाचे खासदार सुनील मेंढे, माफसुचे कुलगुरु डॉ.आशिष पातूरकर, पशुसंवर्धन आयुक्त एस.पी. सिंग, मत्स्यव्यवसाय आयुक्त शीतल उगले, यांच्यासह पूर्व विदर्भातील वर्धा वगळता नागपूर जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, गोंदियाच्या जिल्हाधिकारी नयना गुंडे, भंडाराचे जिल्हाधिकारी विनयकुमार मून, गडचिरोली जिल्हाधिकारी संजय मिना, नागपूर जिल्हा परिषदेचे सिईओ योगेश कुंभेजकर, गोंदियाचे अनील पाटील, गडचिरोलीचे कुमार आशीर्वाद, चंद्रपूरचे विवेक जान्सन, मत्स्य व्यवसायातील संशोधक, तज्ञ व अधिकारी उपस्थित होते.

नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये असणाऱ्या गोड्या पाण्याच्या विपुल जलसाठ्यांमध्ये मासेमारीला प्रोत्साहन देण्यासाठी अधिनियम तयार करणे, केंद्र शासनाच्या भारतीय कृषी अनुसंधान परिषद -केंद्रीय गोडेपाणी मत्स्यसंवर्धन संस्था (आयसीएआर-सीआयएफए ) चे एक प्रादेशिक केंद्र चंद्रपूर येथे स्थापन करणे, विदर्भ मत्स्य विकास आराखडा तयार करणे, गडचिरोली जिल्ह्यातील वडसा येथे पशुधन प्रजनन केंद्र विकसित करणे, आदी विषयांसाठी आज महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या सभागृहात वरिष्ठ पातळीवर विचारमंथन झाले.

मत्स्य व्यवसाय क्षेत्रातील सुधारणा आणि विकासासाठी विदर्भ प्रदेशात मत्स्यबीज उत्पादनासाठी क्लस्टर म्हणून विकसित केला



जाऊ शकतो. येथील विपुल जलसंपत्तीमुळे राज्यांमध्ये अंतर्गत मत्स्य व्यवसाय विकसित करण्यास भरपूर वाव असल्याचे प्रतिपादन श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी त्यांनी केले.

यासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद-केंद्रीय गोडेपाणी मत्स्यसंवर्धन संस्था (आयसीएआर-सीआयएफए) चे एक प्रादेशिक केंद्र चंद्रपूर येथे स्थापन करण्याबाबतची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येत आहे. गोड्या पाण्यातील मत्स्यपालन संशोधन प्रशिक्षण आणि विस्तारासाठी ही एक प्रमुख संस्था आहे. सध्या कौशल्य गंगा (भुवनेश्वर), रहाराह (पश्चिम बंगाल) आनंद (गुजरात), विजयवाडा (आंध्र प्रदेश), बंगलोर (कर्नाटक), कल्याणी (पश्चिम बंगाल) येथे प्रादेशिक केंद्र आहेत. याच प्रमाणे महाराष्ट्रात चंद्रपूर येथे हे केंद्र उभारणे आवश्यक आहे. यासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद व केंद्रीय गोडेपाणी,मत्स्यसंवर्धन संस्थेला विनंती करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या केंद्रामुळे राज्यातील गोड्या पाण्यातील मत्स्य पालन वेगाने वाढेल व त्या संदर्भातील प्रशिक्षण व तंत्रज्ञान या भागातील मत्स्यव्यवसायिकांना उपलब्ध होतील, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी विदर्भ मत्स्य विकास आराखडा तयार करण्याबाबतच्या सूचनाही केल्या. महाराष्ट्र राज्याच्या एकूण भूजलयीय मस्त उत्पादनामध्ये विदर्भाचा वाटा ४६ टक्के आहे. पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात गाव तलाव, मालगुजारी तलाव, तळी, जलाशय, उपलब्ध आहेत. त्यामुळे विदर्भातील मत्स्य विकास आराखडा तयार करणे आवश्यक असून त्यातून हमीयुक्त रोजगार निर्मिती झाली पाहिजे असे, प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

राज्यामध्ये सध्या समुद्रातील मासेमारीशी संबंधित भारतीय मत्स्य पालन अधिनियम १८९७ वर आधारित सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ हा कायदा अस्तित्वात आहे. मात्र यामध्ये भूजल मत्स्यव्यवसाय संदर्भात तरतुदी नाहीत. त्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या धरतीवर गोड्या पाण्यातील मासेमारी अधिनियम तयार करण्याबाबतच्या सूचना त्यांनी विद्यापीठाला केल्या. या सुधारणांमधून मत्स्य व्यवसायाला व्यावसायिक दर्जा, सुरक्षितता प्राप्त होईल याकडे लक्ष देण्याचे त्यांनी सांगितले.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये श्वेतक्रांती आणण्यासाठी वडसा येथील प्रकल्पाचा उपयोग झाला पाहिजे. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची जुळवणी करणे. मदर डेअरीच्या अधिपत्यात हा जिल्हा आणणे, त्यासाठी निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेगवेगळ्या स्तरावर अभ्यासगटाची स्थापना करणे, विदर्भातील जलसाठ्यांचा सर्वकष अभ्यास करणे, जलसाठांच्या बाजूला मत्स्य व्यवसायासाठी जागा उपलब्ध करणे, नागपूरमध्ये वेगळे मच्छीमार मार्केट तयार करणे, मोठ्या सिंचन प्रकल्पावर मच्छीमारांसाठी पायाभूत सुविधा उभारणे, मालगुजारी तलाव आणि मासेमारी सांगड घालणे, लिलाव करताना जिल्हाधिकाऱ्यांचा सहभाग अधिक मध्यवर्ती करणे, समृद्धी महामार्गाला लक्षात घेऊन निर्यात युनिट तयार करणे, शेतकऱ्यांना पूरक नव्हे तर पर्यायी व्यवसाय म्हणून मत्स्य व्यवसायाला प्रोत्साहन देणे, छोटी संकलन केंद्र व स्टोरेज केंद्र तयार करणे, आदी सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना केल्या.

# मावा,तुडतुडा व खोडकिडामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतक-याना मदत करा-जनतेची पार्टी मागणी



**गोंदिया,:-** जिल्ह्यात मावा तुडतुड़ा, व खोडकीड़ामुळे अनेक शेतक-यांच्या शेतपिकाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे.गोंदिया जिल्हा हा शेतक-यांनी व्याप्त असून या जिल्ह्यातील लोकांचे मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यांचे जीवन शेतीवर अवलंबून असल्याने त्यांना उदर निर्वाह करीता फारच अडचणीचा सामना करावे लागणार.याकरीता मदतीसाठी त्यांना नुकसान झालेल्या शेतपिकाचे त्वरित चौकशी करून पंचनामे करणे अत्यंत आवश्यक आहे.यासाठी शेतक-यांच्या हिताचा विचार करता त्वरित चौकशी करुन पंचनामे करण्यात यांवे अशी मागणी जनतेची पार्टीचे अध्यक्ष भाऊराव उके यांच्या नेतृत्वखाली उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी यांच्याकड़े निवेदनातून करण्यात आली आहे.

या दरम्यान जनतेची पार्टीचे अध्यक्ष भाऊराव उके, किसान आघाडी चे जिल्हाध्यक्ष, मोहन गौतम, सभापती मुनेश रहांगडाले, ज्ञानचंद जमईवार, काटी जिप प्रमुख, अनंदा वाढीवा,काटी जिप सदस्य, वैशाली पंधरे जिप सदस्य पांजरा, शेखर वाढवे, कनीराम तावाड़े, प.स.समिती सदस्य खमारी, सुंदर अग्रवाल, राजू कटरे, सोनू पंधरे, मनीष वैष्णव इत्यादी या दरम्यान उपस्थित होते.